### अध्याय १९ व अध्याय २०

ह्या दोन्ही अध्यायांत सोम, ऋत्विज, इंद्र, अग्नि, सुरारस, अश्विनीकुमार, पितरे, प्रजापती इंद्र, वरूण, सामगायक, ग्रह, अध्वर्यु इत्यादींची स्तुती गावून त्यांना यज्ञसमृद्धीसाठी व कल्याणासाठी प्रार्थना केलेल्या आहेत.

### अध्याय २१

यातील १ व २ ऋचा म्हणजे **वरूणाची सर्वोत्तम प्रार्थना** आहे. ऋचा **३ व ४** ही **वरूण व अग्नि** ह्या उभयतांची प्रार्थना आहे. या मंत्राच्या पठणाने अग्नीला आहुती समर्पण करतात.

### अध्याय २२

अध्वर्यु यजमानांच्या गळ्यात सुवर्णमाला अर्पण करताना आणि यजमान ती स्वीकारताना या ऋचेचा उपयोग करतात. येथून अश्वमेध यज्ञाची कृती कथन करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर त्या यज्ञातील विविध वस्तूंचा विनियोग आणि स्तुतीही करण्यात आलेली आहे.

यज्ञाची सर्व सिद्धता झाल्यावर प्रथम जलाशयावर जाऊन घोड्यास पाण्याने स्नान घालण्यात येते. त्यावेळी **अश्वस्तुती असलेला मंत्र** म्हणण्यात येतो. त्यानंतर त्या स्नानपूत अश्वाला अग्नीच्या जवळ आणून अग्नीला १० आहुती प्रदान करण्यात येतात. त्यामध्ये अश्वांच्या क्रियांचाही समावेश करण्यात आलेला आहे. उदाहरणार्थ: खाली मुख करून खिंकाळणे, फुरफुरणे, नाक फुगवणे, वेगाने धावणे, उड्या मारीत धावणे, शरीर थरथरविणे इत्यादी. त्यानंतर **सवितृदेवाची पूजा व प्रार्थना** करण्यात येते. सवितृदेवतेचे सर्वश्रेष्ठ व पापशून्य तेज आमच्या बुद्धीला प्रेरणा देवो! हा सवितृदेव आमचे रक्षण करो! तसेच तो आम्हाला चांगली बुद्धी व धन देवो! अशी प्रार्थना आहे. सवितृदेव हा ज्ञानी, महान, सर्वश्रेष्ठ, सर्वप्रेरक सज्जन पालक, दानशील व सत्प्रवृत्तबुद्धी वाढविणारा आणि सर्वांची अंत:करणे जाणणारा असा आहे. अशातऱ्हेने सवितृदेवाची स्तुती करण्यात आलेली आहे.

तसेच या अध्यायात **राष्ट्रसमृद्धीसाठीही** प्रार्थना केलेल्या आहेत. 'हे ब्रह्मदेवा, आमच्या राष्ट्रांमध्ये समृद्धी नांदण्यासाठी गुणवान लोकांची निर्मिती कर! राष्ट्रातील प्रत्येकाला न प्राप्त झालेली वस्तू प्राप्त होवो आणि प्राप्त झालेल्या वस्तूचा त्याला उपभोग घेता येवो! आमच्या राष्ट्रात वेळेवर पाऊस पडो! फलवृक्ष फलसमृद्ध होवोत व शेते विविध पिकांनी समृद्ध होवोत! अशातऱ्हेच्या प्रार्थना राष्ट्रसमृद्धीसाठी केल्या गेलेल्या आहेत.

### अध्याय २३

या अध्यायात 'कूट प्रश्नोत्तरांचा' समावेश करण्यात आलेला आहे. उदाहरणार्थ:

एकटा संचार करणारा कोण? **सूर्य**

नष्ट होऊन पुन्हा जन्माला येणारा कोण? **चंद्र**

सर्व बाजूंनी ज्यामध्ये बी पेरतात असे सर्वात मोठे स्थळ कोणते? **पृथ्वी**

थंडीचे औषध कोणते? **अग्नि**

पिलिप्पिला कोणास म्हणतात? **पृथ्वीला**

पिशंगिला कोणास म्हणतात? **रात्रीला**

तसेच, सूर्यासारखे अन्य कोणाचे तेज आहे? **ऋग्वेद व यजुर्वेद**

समुद्रासारखे सरोवर कोणते? **अंतरिक्ष**

पृथ्वीपेक्षा मोठे काय आहे? **इंद्र**

कोणत्या वस्तूला माप नाही? **गाय**

यज्ञासंबंधी अक्षरे किती? **शंभर अक्षरे**

होम किती? **ऐंशी**

सूर्याचे जन्मस्थान कोणते? **ब्रह्म**

पृथ्वीचा शेवट कोणता? **यज्ञवेदी**

**उद्गाता:** हे ब्रह्मा, कोणत्या वस्तूमध्ये पुरुष आणि कोणत्या वस्तू पुरुषात समाविष्ट आहेत?

**ब्रह्मा:** पुरुष पंचमहाभूतात प्रविष्ट झाला असून पृथिव्यादी पंचभूते पुरुषात आहेत.

अश्वाचे वीर्य कोणते? **सोमरस**

वेदत्रयीचे उत्कृष्ट स्थान कोणते? **ब्रह्मदेव**

### अध्याय २४

सोमाला लाल, धूसर, बोरासारखे भगवट रंगाचे पशू आवडतात. पृथ्वीवर अस्तित्वात असलेल्या आणि यज्ञासाठी योग्य असलेल्या पशूंचे स्थान व त्या त्या पशूंची देवता कोण? यासंबंधी सविस्तर माहिती दिलेली आहे.

### अध्याय २५

अश्वमेधामध्ये अश्वांच्या विविध अवयवांचे विविध देवतांसाठी हवन करून त्या त्या देवतांना संतुष्ट करण्यात येते. उदाहरणार्थ:

| अश्वाचा अवयव | देवता |
|---|---|
| दात | **शाद** |
| जिव्हाग्र | **सरस्वती** |
| नेत्रातील बुबुळे | **प्रजापती** |
| भुवयांवरील केस | **द्यावा-पृथ्वी** |
| कान | **श्रोत्र** |

इत्यादी. त्याशिवाय त्याच्या शरीरातील प्रत्येक हाडाची देवता, नाभी, अश्रू, नेत्रमल, रक्त इत्यादींच्या सर्व देवतांची नावे दिलेली आहेत.

**शांतीमंत्रा**मध्ये वायू, पृथ्वी, सोम यांची शांतीसाठी व कल्याणासाठी प्रार्थना करून सर्वांना सुख प्रदान करण्याची विनंती केलेली आहे. **अश्वस्तुती** व **प्रार्थना**ही या अध्यायात आहेत. शिवाय अश्वमेध यज्ञानंतर परिवाराच्या कल्याणासाठी केली गेलेली **अग्नीची प्रार्थना** यात समाविष्ट आहे.

### अध्याय २६, २७, २८

यामध्ये बृहस्पती, इंद्र, वैश्वानर, सोम, अग्नि, वायू इत्यादींच्या कर्तृत्वाचे वर्णन करून यजमानास आणि इतरांसाठी कल्याणप्रद प्रार्थना केलेल्या आहेत.

### अध्याय २९

या अध्यायात अश्वशक्तीची, त्याच्या

सामर्थ्याची, त्याच्या तेजाची गौरवपर वर्णने असून त्याला स्नान घालताना वापरलेल्या गोष्टींना महत्त्वही दिलेले आढळते. याशिवाय यज्ञसंपन्नतेसाठी प्रार्थना केलेल्या आहेत. या अध्यायातील ३७वी ऋचा ही **'केतूचा मंत्र'** आहे. या वैदिक मंत्राचा उपयोग केतूच्या संतोषार्थ करण्याची प्रथा आहे. हा मंत्र ऋग्वेदाच्या पहिल्या मंडलात, तसेच अथर्ववेदात आणि सामवेदातील उत्तरार्चिका या ठिकाणी आढळतो. या मंत्राचा एकूण १७००० जप करण्यास सांगितलेले आहे. तसेच इतर प्रार्थनाही नेहमीप्रमाणे यात समाविष्ट आहेत.

### अध्याय ३०

या अध्यायातील दुसरी ऋचा म्हणजे विश्वविख्यात **गायत्री मंत्र** आहे. तसेच ३री ऋचा ही **सूर्याची** एक उत्तम प्रार्थना आहे. ती अशी: हे विश्वप्रेरक सूर्या, सर्वप्रकारची पापे आमच्यापासून दूर कर आणि जे कल्याणमय असेल तेच आमच्याजवळ आण!

यज्ञामध्ये ज्यांच्या उपस्थितीची अपेक्षा आहे किंवा समावेश झाला तरी बाधा येणार नाही अशा सर्वांची एक यादी यापुढील सर्व ऋचांमध्ये सांगितलेली असून मंडपातील सर्व स्तंभांजवळ ह्या सर्वांची योजना करण्यात आलेली आहे. **पहिल्या स्तंभाजवळ** 'ब्रह्म' देवतेला प्रिय असलेला ब्राह्मण, 'क्षत्र' देवतेला प्रिय असलेला क्षत्रिय, मरूतांना प्रिय असलेला वैश्य, 'तप' देवतेला प्रिय असलेला शूद्र, तसेच 'तम' देवतेला प्रिय असणारा चोर, 'काम' देवतेला प्रिय असणारी व्यभिचारिणी स्त्री इत्यादी हे आहवनीय अग्नीच्या समोरील स्तंभासमोर बद्ध होवोत, असे सांगितलेले आहे. **द्वितीय स्तंभाजवळ** 'गीत' देवतेला प्रिय असलेला नाटकी मनुष्य, धर्मसभेला आवडणारा वक्ता, 'आनंद' देवतेला प्रिय असणारा व स्त्रियांशी मित्रत्व असणारा मनुष्य, 'वरिष्ठ' देवतेला आवडणारा भयानक दिसणारा मनुष्य इत्यादी हे अग्निष्ट यूपाच्या समोर राहोत, अशी योजना केलेली आहे. **तृतीय स्तंभाजवळ** 'तप' देवतेला प्रिय असलेला कुंभाराचा मुलगा, 'माया' नावाच्या देवतेला प्रिय असलेला लोहार, 'कर्म' देवतेला प्रिय असणारा दोऱ्या तयार करणारा मनुष्य, 'मृत्यू' देवतेला प्रिय असणारा पारधी इत्यादींची व्यवस्था अनिष्ट यूपाच्या समोर केलेली आहे. **चौथ्या स्तंभाजवळ** 'ऋक्षिका' नामक देवतेला प्रिय असलेला भिल्लाचा मुलगा, 'पुरुषव्याघ्र' नामक देवतेला प्रिय असणारा माजोरी मनुष्य इत्यादी. तर **पाचव्या स्तंभाजवळ** 'संधि' देवतेला प्रिय असणारा व्यभिचारी, 'गेह' देवतेला प्रिय असणारा स्त्रीचा जार, 'निष्कृति' देवतेला प्रिय असणारी विविध रूपे धारण करणारी स्त्री इत्यादींची योजना अनुक्रमे चौथ्या अग्निष्ठ नावाच्या यूपाशी व अग्निष्ठ नावाच्या पाचव्या यूपाशी केलेली आहे.

देवतांना प्रिय असलेला विद्या, विनय व धनसमृद्धी लाभलेला मनुष्य, यमाला प्रिय असणारी वंध्या इत्यादींना **सहाव्या स्तंभाजवळ** स्थान दिलेले आहे. **सातव्या स्तंभाजवळ** 'संवत्सर' देवतेला प्रिय असणारी पांढऱ्या केसांची स्त्री, 'ऋभु' नामक देवतेला प्रिय असणारा चर्मकार, 'साध्य' देवतांना प्रिय असलेला कातडे कमावणारा मनुष्य इत्यादींना स्थान दिलेले आहे.

अशातऱ्हेने **एकूण अकरा स्तंभ** असून त्या त्या स्तंभाजवळ यज्ञामध्ये ज्यांची उपस्थिती आवश्यक आहे त्यांना स्थान दिलेले आहे. हा संपूर्ण अध्याय या अशातऱ्हेच्या यादीनेच जवळजवळ व्यापलेला आहे.

### अध्याय ३१

या अध्यायात प्रसिद्ध **पुरुषसूक्त** आहे. या सूक्ताचा उपयोग भगवान विष्णूवर अभिषेक करण्यासाठी केला जातो. त्याचप्रमाणे या सूक्ताच्या पठणाने मानवी शरीरात पौरुष प्रस्थापित होते. तसेच नपुंसकत्वही नष्ट होते.

या अध्यायातील २२वी ऋचा ही एक उत्तम **सूर्यप्रार्थना** आणि स्वरूप परिसर स्पष्ट करणारी ऋचा आहे.

### अध्याय ३२

**वेदकालीन कालपरिमाणे** या अध्यायात दिलेली आहेत.

**कालमापन—** २ परमाणू = १ अणू, ३ अणू = १ त्र्यसरेणू, ३ त्र्यसरेणू = १ त्रूटी, १०० त्रूटी = १ वेध, ३ वेध = १ लव, ३ लव = १ निमिष, ३ निमिष = १ क्षण, ५ क्षण = १ काष्ठा, १५ काष्ठा = १ लघु, १५ लघु = १ घटका, २ घटका = १ मुहूर्त, ३ ³/₄ मुहूर्त = १ प्रहर, ८ प्रहर = १ दिवस, १५ दिवस = १ पक्ष, २ पक्ष = १ मास, २ मास = १ ऋतु, ३ ऋतु = १ अयन, २ अयन = १ वर्ष

या अध्यायात परमेश्वराची स्तुती करून त्यास विविध प्रार्थना केलेल्या आहेत. ज्या पुराण पुरुषाची यशस्वी, कीर्तिवान, महान म्हणून वेदांमध्ये प्रसिद्धी आहे त्या परमेश्वराला उपमा देता येईल अशी एकही वस्तू या विश्वात नाही. त्यास अचिंत्यशक्ती परमात्मा म्हटलेले आहे.

१६वी ऋचा ही **लक्ष्मीला केलेली एक उत्तम प्रार्थना** आहे.

### अध्याय ३३

अग्निदेवतेची स्तुती व तिला इच्छित गोष्टी प्राप्त होण्याकरिता नेहमीप्रमाणेच केलेल्या प्रार्थना या अध्यायात आहेत. तसेच इंद्रदेवतेची स्तुती करून तिला यज्ञासाठी पाचारण केलेले आहे. ३१वी ऋचा **ही सौरसूक्तातील** ऋचा असून ती ऋग्वेद, सामवेद व अथर्ववेदातही आढळते. केवळ या एका ऋचेच्या पठणाने अंगात उष्णता निर्माण होऊन मनुष्याचे शीतापासून रक्षण होते.

सूर्यदेवाला केलेल्या प्रार्थनाही यात बऱ्याच आढळतात. सूर्यदेवाची, त्याच्यापराक्रमाची, त्याच्या अविनाशी तेजाची प्रचंड स्तुती करून जगाच्या कल्याणासाठी प्रत्येक प्राणीमात्रास, पशुधन, पुत्र-पौत्र या सर्वांस संतुष्ट कर, अशी प्रार्थना केलेली आहे. **४३वी ऋचा** ही **सूर्याची** एक उत्तम प्रार्थना आणि एक **वैदिक मंत्र** आहे. याच मंत्राचा जप करून सूर्यदेवतेला वश केले जाते. ही ऋचा ऋग्वेदातही आलेली आहे. या अध्यायात अग्नि व सूर्यदेवतेप्रमाणेच मित्र, वरूण, आदिती, इंद्र, पृथ्वी, द्युलोक, आदित्य, तश्याच इतर पूजनीय देवता आणि मरूत्, वसु, रूद्र, आदित्य आणि अन्य सर्व देवगण, अंतरिक्षात संचार करणारे अत्यंत पूजनीय विश्वदेव, सर्वांना कर्मप्रेरणा

देणारा सवितृदेव, तसेच मरूत् इत्यादी देवतांची स्तुती करून, त्यांना विविध प्रार्थना करून इष्ट फळ देण्यासाठी आवाहन केलेले आहे.

### अध्याय ३४ व अध्याय ३५

अध्याय ३४ मध्ये सुरुवातीच्या काही ऋचा ह्या **'मानवी मनाचे'** महत्त्व सांगणाऱ्या ऋचा आहेत. फार सुंदर रीतीने मानवी मनाची संकल्पना यात मांडलेली आहे. मन सर्वसामान्य आणि विशेष अशा ज्ञानाचे उत्पत्तीस्थान आहे. धैर्याचे जन्मस्थानदेखील तेच आहे. ते मन पुरुषाच्या, किंबहुना सर्व प्राणीमात्रांच्या अंतरात राहून सर्व इंद्रियांना प्रकाशित करते. ते अमृताचा स्पर्श जाणविणारे आहे. त्याच्या अस्तित्वाशिवाय शरीरस्थ इंद्रियांना कोणतेही कार्य करता येत नाही. मनाच्या अस्तित्वाने केलेल्या अध्ययनाच्यायोगे ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद प्रतिष्ठित होतात. मनाच्या सहाय्याशिवाय हे अनुष्ठान पार पाडता येत नाही. मन हे बाल्य, तरुण व वार्धक्य अशा तिन्ही अवस्थांमध्ये शक्तिसंपन्न होऊन रहाते. ते अतिशय वेगाने संचार करीत असते. अशा माझ्या मनात विश्वाचे कल्याण करणारा संकल्प सदैव राहो, अशातऱ्हेची प्रार्थना वरचेवर केलेली आहे. तसेच इतर देवतांनाही नेहमीप्रमाणेच प्रार्थना केलेल्या आहेत.

३५व्या अध्यायातही यजमान, मित्र, अपामार्ग, उदक, औषधी, अग्नि, पृथ्वी इत्यादी देवतांना केलेल्या प्रार्थना आहेत.

### अध्याय ३६

यामधील ३री ऋचा ही व्याहृति-सहित असलेला **गायत्री मंत्र** होय!

**ॐ भूः भुर्वः स्वः तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि। धियो यो नः प्रचोदयात्॥**

**अर्थ –** पृथ्वी, अंतरिक्ष आणि स्वर्ग ह्या तीनही लोकांपासून अत्यंत दूर असलेल्या आमच्या बुद्धीला सन्मार्गाकडे जाण्याची प्रेरणा देणाऱ्या, सर्व पापांचे दहन करण्यास समर्थ असलेल्या आणि अत्यंत आदरणीय सूर्यदेवतेच्या तेजाचे आम्ही ध्यान करतो.

ऋचा ९, १०, ११, १२ ह्या चार ऋचा **'शांतिमंत्र'** म्हणून प्रसिद्ध आहेत.

### अध्याय ३७ व अध्याय ३८

ह्या दोन्ही अध्यायांत परमेश्वर, पृथ्वी, धर्मदेव, मनुकन्या, दुग्धा, रश्मी, सरस्वतीरूपी धेनू, अश्विनीकुमार, इंद्र इत्यादी देवतांची स्तुती करून इप्सित फलप्राप्तीसाठी प्रार्थना केलेल्या आहेत.

### अध्याय ३९

या अध्यायातील पहिल्या सहा ऋचांमध्ये विविध देवतांच्या उपासनेमध्ये झालेले दोष घालविण्यासाठी आणि ज्या मानवी शरीराच्या अवयवांकडून हे दोष घडले त्यांना दोषशून्य करण्यासाठी अग्नीला मंत्रोच्चारपूर्वक आहुती देण्यात येतात. ऐकेक देवतेचे नाव उच्चारून या आहुती दिल्या जातात. उदाहरणार्थ: हिरण्यगर्भ आणि सर्व प्राणीमात्रांचा अधिपती, पृथ्वी, अग्नि, अंतरिक्ष, वायू, द्युलोक, सूर्य, दिशा, चंद्र, नक्षत्र, उदक, वरूण, वाणी, प्राण, इंद्रिय, चक्षू, नेत्र, नाभिदेवता, बुद्धी इत्यादी. ऋचा ५ – **महावीर नावाच्या** पात्रासंबंधी असलेले विविध अधिकार आणि स्थिती याचे वर्णन **या मंत्रात** आहे. या महावीर पात्राचे कार्य एकूण १२ दिवस असते. प्रत्येक दिवशी त्या पात्रावर निरनिराळ्या देवतांचे नियंत्रण असते. उदाहरणार्थ: पहिल्या दिवशी सविता, दुसऱ्या दिवशी वायू, तिसऱ्या दिवशी अग्नि इत्यादी.

### अध्याय ४०

हा अध्याय म्हणजे सर्व उपनिषदांच्या मालिकेतील पहिले म्हणून गणले गेलेले 'ईशावास्य' नावाचे उपनिषद् होय! या उपनिषदात एकूण १७ ऋचा किंवा मंत्र आहेत.

या अखिल विश्वामध्ये स्थावर व जंगम अशा ज्या वस्तू आहेत त्या सर्व वस्तू ईश्वराने आपल्या सत्तेने व्यापून टाकलेल्या आहेत.

प्रत्येकाने आपल्या वाट्याला जे कर्म आले आहे ते करीत रहावे. ते करीत राहिल्यास त्या कर्मापासून निर्माण होणारी बंधने माणसाला बद्ध करू शकत नाहीत.

ज्ञान संपादन न करणे हा आत्मघात आहे.

परब्रह्म हे अचल, अद्वितीय, मनापेक्षाही गतिमान आणि अविनाशी आहे. या ब्रह्मरूपाला देवसुद्धा जाऊन पोचत नाहीत. परब्रह्म या जगाच्या अंतर्यामी ज्याप्रमाणे अधिष्ठित आहे त्याप्रमाणे जगाच्या बाहेरही व्यापून राहिलेले आहे.

ज्ञाता पुरुष सर्वरूप असून तो अत्यंत उज्ज्वल अशा ब्रह्मरूपाला प्राप्त होतो. तो त्रिकालज्ञानी, बुद्धिमान, सर्वव्याप्त आणि स्वतःच परब्रह्म झालेला असतो.

जो ज्ञानीपुरुष वर्णधर्मयुक्त असलेले हे शरीर आणि परब्रह्म ही दोन्ही तत्वे एकत्वरूपाने जाणतो तो अविनाशी शरीराने मृत्यूला पार करतो आणि मोक्षाला प्राप्त होतो.

चित्ताची एकाग्रता करण्यापूर्वीच ज्ञानमय कर्म करणारे पुरुष हे अंधःकारमय जगात प्रवेश करतात.

तत्वज्ञान, ईश्वरविषयक ज्ञान ह्या दोन्ही ज्ञानांना जाणणारा पुरूष विद्येच्या योगाने अमृतत्वाला प्राप्त होतो.

शरीर हे नाशवंत आहे. म्हणून विश्वाचे मूळ व ब्रह्माचे प्रतीक समजल्या जाणाऱ्या ॐ ची उपासना करावी. आदित्य मंडलात असलेला जो परब्रह्मपुरुष तो मीच आहे.

अध्याय ३९ पर्यंत जे मंत्र आलेले आहेत त्यांना कर्मकाण्ड म्हणून प्राधान्य दिले जाते. त्यानंतर साधकाच्या चित्ताची शुद्धी होऊन त्याला ईशप्राप्तीची अनुभूती प्राप्त व्हावी म्हणून ज्या तत्वज्ञानाचा आश्रय यजुर्वेदाने घेतला आहे त्याला 'वेदांत' असे नाव आहे.

त्यामुळे हा अध्याय म्हणजे 'एक स्वतंत्र ज्ञानकांड' असे मानले जाते.

असा हा यजुर्वेद. ऋग्वेदानंतर वेदसागरामध्ये याचा दुसरा नंबर लागतो. याचाही विस्तार महाप्रचंड आहे. तेव्हा त्याच्या अंगाला साधा स्पर्श जरी करता आला तरी ते भाग्यही काही थोडेथोडके नाही म्हणायचे!

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ३३.१५ | १२.०० |
| २. | श्री साई सत्चरित | इंग्रजी | १८.५० | १०.०० |
| ३. | श्री साई सत्चरित | हिंदी | १८.०० | १०.०० |
| ४. | श्री साई सत्चरित | गुजराथी | २४.०० | ११.०० |
| ५. | श्री साई सत्चरित | कन्नड | १७.७५ | १०.०० |
| ६. | श्री साई सत्चरित | तेलुगु | २०.७० | १०.०० |
| ७. | श्री साई सत्चरित | तामीळ | २६.५० | १०.०० |
| ८. | श्री साई सत्चरित | सिंधी | २२.०० | १०.०० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ८.२५ | १०.०० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० | १०.०० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ११.५० | १०.०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ७.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.१५ | ७.०० |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० | ७.०० |
| १७. | स्तवनमंजरी | इंग्रजी | २.०० | ७.०० |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.०० | ७.०० |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० | ७.०० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | ०.९५ | ७.०० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ३.६० | ७.०० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | १.२५ | ७.०० |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | २.५० | ७.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ६.८० | ७.०० |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | १.६० | ७.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० | ७.०० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | १.६० | ७.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ | ७.०० |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | २.३० | ७.०० |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ | ७.०० |
| ३१. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.७० | ७.०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ४.५० | ७.०० |
| ३३. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | ७.०० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५.२५ | १०.०० |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ९-५० | १०-०० |

# श्री साईभक्तांना नम्र आवाहन

शिरडी संस्थान हे देशभर भारताच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेतील श्री साईबाबांच्या लाखो भक्तांचे तीर्थयात्रेचे व श्रद्धेचे स्थान झालेले आहे. प्रत्येक दिवसागणिक भाविकांची वाढती लोकप्रियता या संस्थानला लाभली असून त्याची भारतातील एक प्रमुख विश्वस्तनिधि म्हणून गणना होत आहे.

गेली काही वर्षे साईभक्तांच्या सतत वाढणाऱ्या गर्दीमुळे श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या विविध सोयींवर अतोनात ताण पडत आहे. या लाखो भाविकांना शिरडीचा निवास सुखाचा व सोईचा व्हावा म्हणून श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे विद्यमान विश्वस्त मंडळ शिरडीच्या सर्वांगीण विकासासाठी अनेकविध योजना राबवित आहे.

**'साईबाबा-भक्त-निवास'** या इमारतीचे बांधकाम हाती घेऊन ५०० भाविक कुटुंबांची राहण्याची सोय करण्याच्या दृष्टीने संस्थानने पहिले पाऊल उचलले. या इमारतीचे बांधकाम आता पूर्ण झाले असून ही इमारत भाविकांना निवासाकरिता श्री साईबाबांच्या पुण्यतिथीपासून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या खोल्यांमधून भाविकांना सर्व सोयी स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. माफक दरात येथे भाविकांची राहण्याची सोय करण्यात आली आहे. याशिवाय सध्या उपलब्ध असलेल्या सभागृहापेक्षा मोठे, असे २ सभागृह बांधण्यात आले आहेत. या सोयीमुळे सुमारे ३,५०० अतिरिक्त भाविकांची उत्तम व्यवस्था येथे होणार आहे. तसेच रात्रंदिवस सेवा चालू असेल असे एक खाद्य-पेयगृहही त्याच जागेत आहे.

भाविकांची प्रत्यही वाढणारी संख्या लक्षात घेऊन **मंदिर-परिसराच्या विस्तारीकरणाची योजनाही** हाती घेण्यात आली आहे. या विस्तारीकरणामुळे श्री साईबाबांचे दर्शन भाविकांना सुलभतेने व सहजतेने घेता येणार आहे. त्यांचा सध्याचा त्रास त्यामुळे कमी होईल.

विद्यमान विश्वस्त मंडळाने **स्वच्छ व मुबलक पाणी, उत्तम वैद्यकीय सेवा, हृदयरोग अतिदक्षता विभाग, सोनोग्राफी केंद्र, क्ष-किरण कक्ष, इंग्रजी माध्यमाची शाळा, कन्याशाळा, संस्थानच्या उत्पन्नात वाढ,** कामात सूसूत्रीपणा आदी योजनांना दृश्यरूप दिले असून **मंदिर-परिसराचे विस्तारीकरण, रुग्णालयाचा विस्तार,** आदी योजनाही लवकरच दृश्यरूप धारण करणार आहेत.

श्री साईबाबांच्या कृपेने व आशीर्वादाच्या बळावर संस्थानने वरील नमूद केलेले महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतलेले आहेत. आपली मदत आम्हाला हरतऱ्हेने हवी आहे. भारताच्या उज्ज्वल धार्मिक परंपरेचे संवर्धन या प्रकल्पाकरिता 'देणगी' दिल्याने होणार आहे.

शिरडी संस्थानच्या वतीने मा. अध्यक्षा आपणाला या कार्याकरिता उदारहस्ते मदत करण्याचे विनम्र आवाहन करीत आहेत.

कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान, शिरडी
मु. पो.: शिरडी, तालुका: कोपरगांव,
जिल्हा: अहमदनगर.

सूचना: चेक **'श्री साईबाबा संस्थान, शिरडी'** या नावाने पाठवावेत.


# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## विश्वस्त मंडळ

प्रा. डॉ. लेखा पाठक (अध्यक्षा)
श्री. हेमराज शहा.
श्री. मनोहर ना. गोगटे
श्री. ब्रिजमोहन भामशा
श्री. पृथ्वीराज रा. आदिक
श्री. शिवराम रा. शिंदे
श्री. राजीव प्र. कुलकर्णी
डॉ. एकनाथ भा. गोंदकर
श्री. प्रभाकर तु. बोरावके
श्री. भिमाशंकर व्यं. खांबेकर
श्री. बाबुराव अ. नरोडे (पाटील)
श्री. दादासाहेब श. रोहमारे (पाटील)
श्री. प्रभाकर भि. बोरावके
श्री. उत्तमराव रं. शेळके
श्री. सोपानराव मा. धोर्डे
श्री. कारभारी भि. देवकर
श्री. अनंतकुमार कि. पाटील
श्री. मोतीराम सि. पवार
श्री. प्रशांत व्यं. हिरे
प्रा. नारायण स. फरान्दे (आमदार)
श्री. अण्णासाहेब म्हस्के (आमदार)
श्री. दिलीप अ. शिंदे
श्री. गोपीनाथ ब. कोते (पाटील)
श्री. श्रीपतराव मा. जाधव
श्री. मोहन मो. जयकर
श्री. विष्णुपद श्री. बुटे
(कार्यकारी अधिकारी)

# सर्व साईभक्तांना आवाहन !

प्रिय साईभक्तांनो !

सप्रेम नमस्कार.

आपण 'श्री साईलीला'चे वाचक आणि वर्गणीदार आहात. 'श्री साईलीला'चे नवे स्वरूप आपणा सर्वांनाच आवडले आहे. आपणापैकी अनेकांनी तशी पत्रे आम्हाला पाठविली आहेत. त्याबद्दल धन्यवाद !

श्री साईबाबांचे कार्य, त्यांची शिकवण, भक्तांना आलेले त्यांचे अनुभव आणि अध्यात्माचा प्रसार अधिकाधिक लोकांत करणे म्हणजेच साईसेवा आहे. त्यासाठी 'श्री साईलीला' सर्वाधिक लोकांपर्यंत पोहोचावयास हवा.

या साईसेवेत आपण वाढ करू शकता !

आपण फक्त पाच वर्गणीदार 'श्री साईलीला'स मिळवून द्यायचे. यामुळे आपल्या हातूनही साईसेवा घडेल आणि श्री साईबाबा आपल्यावरही कृपा करतील याची आपणासही कल्पना आहेच.

तरी खालील फॉर्मवर पाच वर्गणीदारांचे पत्ते व प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण २५० रु. पाठवावे. चेक कृपया 'श्री साईबाबा संस्थान, शिरडी' या नावावर असावा.

कळावे. श्री साईबाबांच्या आशीर्वादासह !

आपला स्नेहांकित,
**– अरुण ताम्हणकर**
कार्यकारी संपादक
**'श्री साईलीला'**

-------------------✂------------------ इथे कापा ---------------------✂---------------------

कार्यकारी संपादक
**'श्री साईलीला'**,
८०४-बी, साईनिकेतन,
डॉ. आंबेडकर रोड, दादर (पू.),
मुंबई – ४०० ०१४.

यांस,

आपण साईभक्तांना आवाहन केल्याप्रमाणे सोबतच्या जोडलेल्या कागदावर पाच वर्गणीदारांचे पत्ते पाठवीत असून त्यांची प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण रु. २५० (एकूण दोनशेपन्नास रुपये मात्र) सोबत मनीऑर्डरने/चेकद्वारा/रोख पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्याची संधी आपण यानिमित्ते मला देऊन साईसेवा करण्यास उद्युक्त केलेत याबद्दल आभारी आहे. कळावे.

आपला,

नाव : ____________________


पत्ता : ____________________

____________________

____________________


(ता.क.: सोबतच्या कागदावर पाच नव्या वर्गणीदारांचे पत्ते जोडले आहेत.)






नागपूरचे लक्षाधीश सावकार व प्रख्यात साईभक्त श्रीमंत गोपाळराव उर्फ बापूसाहेब बुट्टी यांचा वाडा मुरलीधराचं मंदिर होऊ घातलं होतं. ते बाबांचं समाधीमंदिर झालं.... ''देऊळ पूर्ण झालियावरती। येऊं कीं वस्तीस आपणही'' ॥ लावूनि वाडियाकडे दृष्टी। बाबा करीत मधुर गोष्टी। ''वाडा पुरा झालियापाठीं। आपुलेसाठींच तो लावूं॥ तेथेंच आपण बोलूं चालूं। तेथेंच आपण अवघे खेळूं। प्रेमें आपापणा कवटाळूं। भोगूं सुकाळू आनंदाचा॥

जीर्ण-शीर्ण मशिदीला बाबांनी 'द्वारकामाई'चं रूप दिलं आणि चारी वर्णांना ती खुली केली. बाबांच्या अगणित लीलांची ही द्वारकामाई साक्षी आहे.








चावडी : एक दिवसाआड बाबांना येथे मिरवणुकीने आणले जात असे. त्यांची येथे आरती होत असे. त्या दिवशी त्यांचा येथे मुक्काम असे.





गुरुस्थान :
म्हणे हें माझ्या गुरुचें स्थान।
अति पवित्र हें माझें वतन।








लेंडीबाग : या बागेतून एक नाला वहात असे. त्याला 'लेंडी' असे म्हटले जाई. यावरूनच या बागेला 'लेंडीबाग' असे नाव पडले असावे. बाबांनी येथे फुलझाडे लावली होती. स्वत: ते त्यांना पाणी घालीत असत. सकाळी व दुपारी असे दोन वेळा बाबा लेंडीबागेत जात असत. तेथे बाबांनी सुमारे दोन फूट खोल खड्डा खणला होता व त्यात एक दीप सतत प्रज्वलित ठेवला होता.

सप्टेंबर – ऑक्टोबर १९९३ रु. ८

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक





हा काय एका जन्माचा निर्बंध।
बहात्तर पिढ्यांचा ऋणानुबंध।
भक्तांचा बाबांनीं पूर्वसंबंध।
कथानुबंध कथियेला॥१४३॥

ऐसें बांधुनी प्रेमफांसा।
वाटती महाराज गेले प्रवासा।
येतील मागुतेनी हा पूर्ण भरवंसा।
भक्तमानसा झालासे॥१४४॥

साक्षात्कार कित्येकांसी।
दृष्टान्तानुभव बहुतेकांसी।
चमत्कार तो अनेकांसी।
गुप्तरूपेंसीं दाविती॥१४५॥

अभाविकां गुप्त असती।
भक्तां भाविकां ठाईंचि दिसती।
जैसी जयाची चित्तवृत्ति।
तैसीचि अनुभूति रोकडी॥१४६॥

असो सांप्रत हाचि विश्वास।
भक्तीं धरावा निज जीवास।
भंग नाहीं समर्थसाईंस।
अक्षय रहिवास अखंड॥१४८॥

**–अध्याय ४३, श्री साईसच्चरित**



# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत नियतकालिक

वर्ष ७२ अंक ६-७

सप्टेंबर–ऑक्टोबर ९३

संपादक
प्रा. डॉ. लेखा पाठक

मुखपृष्ठ
हेमंत चोणकर

अक्षर जुळवणी व ऑफसेट छपाई
गीता ऑफसेट, वडाळा, मुंबई.

कार्यालय
'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई–४०० ०१४.
दूरध्वनी : ४१२२५६१

वार्षिक वर्गणी– रु. ५०/-,
आजीव सभासद वर्गणी– रु. १,०००/-,
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी– रु. १,०००/-
(टपाल खर्चासहित)
किरकोळ अंक– रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक प्रा. डॉ. लेखा पाठक, अध्यक्षा, श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई–४०० ०१४ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले.



या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांविषयीची कोणतीही कायदेशीर कारवाई मुंबईच्या न्यायकक्षेतच होऊ शकते, याची कृपया नोंद घ्यावी.


संपादकीय

# "तुमचा मी भार वाहीन सर्वथा...."

प्रत्येक व्यक्तीचं, मग ती व्यक्ती कोणत्या का धर्माची, कोणत्या का जातीची असे ना वा कोणतीही विचारसरणी अंगिकारलेली, कोणतीही मतप्रणाली स्वीकारलेली असे ना का, आस्तिक असो, नाहीतर नास्तिक, एकतरी श्रद्धा-स्थान हे असतंच. ते श्रद्धा-स्थान सगुण रूपातील असू शकेल अथवा निर्गुण रूपातील; त्यावर त्या व्यक्तीची नितांत श्रद्धा असते. त्या श्रद्धा-स्थानाला त्या व्यक्तीच्या हृदयात जसे स्थान असते, तसेच ते श्रद्धा-स्थान सतत आपल्या नजरेसमोर असावं म्हणून ती व्यक्ती त्या श्रद्धा-स्थानाची चित्राच्या, मूर्तीच्या रूपात प्रतिष्ठापना करते. या संदर्भात स्वामी विवेकानंदांच्या जीवन-चरित्रातील आपणा सर्वांना माहीत असलेल्या एका हृद्य घटनेचा येथे आवर्जून उल्लेख करावासा वाटतो.

फेब्रुवारी १८९१ नंतर स्वामी विवेकानंद जेव्हा देश-भ्रमण करीत होते, तेव्हा एकदा त्यांची आलवरचे राजा मंगलसिंह यांच्याशी भेट झाली. मूर्तिपूजेबाबत अविश्वास दाखविताना राजा मंगलसिंह यांनी स्वामी विवेकानंदांना विचारले,

"मी इतर लोकांसारखा लाकडाच्या किंवा मातीच्या अथवा धातूच्या मूर्तीची पूजा करीत नाही; म्हणून मला काय मृत्यूनंतर नरक प्राप्त होणार?"

त्याचवेळी स्वामींची दृष्टी तेथल्या भिंतीवर टांगलेल्या महाराजांच्या तस्वीरवर गेली. स्वामींनी ती तस्वीर खाली उतरवून घेतली. स्वामींनी तेथे उभ्या असलेल्या दिवाणजींना विचारले,

"ही तस्वीर कोणाची?"

दिवाणजी उत्तरले,

"आमच्या महाराजांची!"

दुसऱ्याच क्षणी उपस्थित सगळ्यांचा थरकाप उडाला, जेव्हा स्वामींनी त्या दिवाणजींना त्या तस्वीरवर थुंकायला सांगितले. दिवाणजी तर थरथरा कापू लागले. त्यांनी तसे करायला नकार देत म्हटले,

"स्वामी, हे आपण मला काय कुकर्म करायला सांगत आहात! महाराजांच्या या प्रतिकृतीवर आपण मला चक्क थुंकायला सांगत आहात! मी माझ्या अन्नदात्याच्या तस्वीरवर कसा काय थुंकू?"

त्यावेळी मंगलसिंह महाराज काय समजायचे ते समजले. स्वामी विवेकानंदांनी मुद्दा स्पष्ट करीत समजावले,

"महाराज, आपण या तस्वीरीत सजीव रूपात विद्यमान नसलात तरी आपले प्रतिकृतीच्या रूपात तेथे अस्तित्व आहे. आपले नोकर-चाकर त्या तस्वीरीत आपले प्रतिबिंब पहातात; आणि म्हणूनच त्या तस्वीरवर थुंकायला त्यांनी ठाम नकार दिला. ईश्वर-भक्त, गुरु-शिष्य इत्यादींच्या बाबतीत हे असंच असतं."

प्रत्येक व्यक्तीच्या श्रद्धा-स्थानाचा त्या व्यक्तीवर एवढा प्रभाव असतो की ते श्रद्धा-स्थान आपल्याला सतत प्रेरणा देत राहो, आपल्याशी अखंड संवाद साधीत राहो, असं त्या व्यक्तीला कायम वाटत रहातं.

आपणा सर्वांचे श्रद्धा-स्थान परम पूजनीय दैवत अखिल ब्रह्मांडनायक राजाधिराज योगीराज सच्चिदानंद सद्गुरु श्री साईबाबांनी तर आपल्या देहावतारातच आपल्या भक्तांना आश्वासन देऊन ठेवले आहे....

**"झालों जरी गतप्राण।**
**वाक्य माझें माना प्रमाण॥**

(पृष्ठ क्र. ६ वर)

# श्री साईबाबा आणि कर्म

–ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)

''कर्मसूत्र मोठे गहन।
कोणासही ना होई आकलन॥''

असे जरी श्री साईसच्चरिताच्या अध्याय ४७ मध्ये म्हटले असले तरी कर्माविषयी विज्ञानातील Action and Reaction (क्रिया आणि प्रतिक्रिया) हे तत्व ध्यानात आणले तर कर्माचा विषय सहज कळेल. नेहमीच्या वागण्यात जे काही आपण करतो त्याचे फळ आपणास भोगावेच लागते; कधी लगेच, तर कधी उशिरा. उदाहरण म्हणून घ्यायचे झाले, तर विस्तवाला हात लावला की तो लगेच भाजतो, धूम्रपान किंवा मद्यपान अति केले, तर काही काळाने शरीर रोगमुखी पडते. याच तत्वाप्रमाणे मागच्या जन्मी केलेल्या कृत्यांचे ज्यांचे फळ त्या जन्मी भोगावयाचे राहिले आहे, ते या जन्मी प्रत्येकाला भोगावेच लागते, त्याशिवाय सुटका नाही.

जो जो जैसें जैसें करील।
तो तो तैसें तैसें भरील॥१६८॥

–अध्याय ३२

पूर्वजन्मीं जैसें करावें।
इये जन्मीं तैसें भरावें।
कर्मभोगा सादर व्हावें।
आतां रडावें किमर्थ॥५८॥

–अध्याय ४७

''जैसी जिसकी नियत,
वैसी उसकू बर्कत''

–बाबांचे रघुवीर पुरंदऱ्यांना सांगणे

## विहित म्हणजे सत्कर्माची शिकवण

म्हणून साईबाबा सर्वांना सत्कर्म करण्याचा, म्हणजे धर्माचरणाने वागण्याचा सदा उपदेश करीत असत:

**''प्रत्येकाने नेकीने, म्हणजे प्रामाणिकपणाने किंवा सचोटीने वागावे. सर्व भूतमात्रांशी प्रेमाने वागावे. वादावादी करू नये. कोणी काही बोलले तरी ऐकून घ्यावे. कोणाच्या बोलण्याने आपल्या अंगाला भोके पडत नाहीत. कोणाची बरोबरी करू नये. कोणाची निंदा करू नये. कोणी काही केले तरी तिकडे लक्ष देऊ नये. त्याचे त्याच्या संगे, आपले आपल्या संगे.''**

**''कष्ट करीत असावे. रिकामे राहू नये. देवाचे नाव घ्यावे. पोथी–पुराण वाचावे.''**

आचारहीन माणसांचा तर बाबा सहवासच टाळण्यास सांगत असत:

कांहीं केले काय झाले।
म्हणती जन ते समजा चळले।
धर्माचरण जयांनी वर्जिले।
तयांस पहिले वर्जावे॥७८॥
समोर येतां बाजूस जावें।
महाभयंकर ते समजावे।
त्यांच्या छायेसही न रहावे।
पडल्या सहावे कष्टही॥७९॥
आचारहीन शीलभ्रष्ट।
विचारहीन कर्मभ्रष्ट।
देखेना जो इष्टानिष्ट।
केवीं तो अभीष्ट पावेल॥८०॥

–अध्याय ३

आणि सज्जन माणसांचा संग करण्यास उपदेश करीत असत:

धरावा नित्य सत्संग।
इतर संग सर्व सव्यंग।
सत्संग एक निर्व्यंग।
अंग प्रत्यंग निर्मळ॥१४२॥

–अध्याय १०

साईबाबा नेहमी म्हणत असत:

ऋण वैर हत्या।
कल्पांतीही न चुकती कर्त्या॥२५॥

–अध्याय ३६

ऋण, मग ते कोणत्याही प्रकारचे असो, द्रव्याचे, अन्नाचे की सेवाचाकरीचे असो, ते माणसाला या जन्मी नाहीतर पुन्हा जन्म घेऊनही फेडावेच लागते. याबद्दल अध्याय ३१ मध्ये दरवेश्यांच्या क्रूर रोगग्रस्त वाघाने बाबांच्या चरणी देहत्याग केल्याने आपले चरितार्थ-साधन हरवल्याने खिन्नवदन झालेल्या त्यांना बाबांनी हेच सांगितले होते:

गतजन्मींचा देणेदार।
फेडावया ऋण हा अवतार।
तुमचिया बंधनीं साचार।
जो आजवर राहिला॥१६३॥

–अध्याय ३१

म्हणूनच बाबांची व्यवहारातील शिकवण होती:

कोणाच्याही श्रमाचा भार।
फुकट लवभार घेऊं नये।
कोणाहीपासूनि घ्यावें काम।
परी जाणावे तयाचे श्रम।
लावावा जीवास ऐसा नियम।
फुकट परिश्रम घेऊं नये॥२४७॥

–अध्याय १९

आणि म्हणूनच स्वत:चे काम कोणाची मदत न घेता स्वत:च ते करण्याची त्यांची सवय होती:

स्वयें कामाची मोठी हौस।
दुजियानें केले न चले त्यांस।
न धरिती कधीं कुणाची आस।
परी न त्रास कवणाचा॥७६॥
हे एक तत्व बाबांपाशीं।
होते जागृत अहर्निशीं।
म्हणून या हंडीचे कार्यासी।
साह्य न कोणाशीं मागत॥७७॥
हंडीच काय धुनीच्या लगत।
सर्पणाचे खोलीची भिंत।
पूर्वभागाची तीन चतुर्थ।
स्वहस्तरचित बाबांची॥७८॥
आणिक बाबा काय न करिती।
मशीद आपण स्वयें सारविती।
हातीं कफनी लंगोट शिवती।
आस न ठेविती कवणाची॥८०॥

–अध्याय ३८

द्रव्यलोभ आणि त्यापासून उद्भवणारे वैर आणि हत्या टाळण्यासाठी तर बाबांचा विशेष कटाक्ष होता. त्याबद्दल अ. ४६ व ४७ मधील दोन शेळ्यांच्या आणि बेडूक व सर्प यांच्या पूर्वजन्मांच्या गोष्टी सांगून त्यांनी आपल्या भक्तांना हे किती सुंदररीतीने पटविले आहे :

**तैसीच आतां हेही कथा।**
**द्रव्यलोभाची परमावस्था।**
**कैसी नेई अध:पाता।**
**सावधानता परिसावी॥१५॥**
**त्यांतही वैरवृत्तीचा वारा।**
**कदाकाळींही नव्हे बरा।**
**तयापासाव मनासी आवरा।**
**करील मातेरा जन्माचा॥३१॥**
**परस्पर वैराचा परिणाम।**
**उत्तमाचा जन्मे अधम।**

– अध्याय ४७

आपल्या भक्तांचा द्रव्यलोभ सुटावा म्हणून बाबा त्यांच्याकडून वारंवार दक्षिणा मागून घेत असत, हेही आपणास ठाऊक आहेच :

**पोटासाठी भिक्षा मागत।**
**दक्षिणेपोटीं नव्हता स्वार्थ।**
**दक्षिणादानें शुद्धचित्त।**
**व्हावेत निजभक्त हा हेत॥१५४॥**

– अध्याय १४

आपल्या धर्मशास्त्रात दानाचे महत्त्व आणि तेही कलियुगात विशेष सांगितले आहे. तैत्तिरीय उपनिषदात तर दानाचे अनेक प्रकार सांगून मनुष्याने श्रद्धेने नित्य दान करण्याचा आग्रह केला आहे. म्हणूनच की काय बाबा सदा सांगत :

**आल्यागेल्याचा आदर करीं।**
**तृषितां जल भुकेल्या भाकरी।**
**उघड्यास वस्त्र बसाया ओसरी।**
**देता श्रीहरी तुष्टेल॥१४२॥**

– अध्याय १९

दानात अन्नदान अग्रगण्य समजले जाते :

**षड्रसान्नीं जैसे वरान्न।**
**पुण्यात पुण्य अन्नदान॥३१॥**

– अध्याय ३८

म्हणून बाबा स्वत: हंडीत अन्न शिजवून गोरगरिबांना खाऊ घालीत असत, हे अध्याय ३८ मध्ये आपण वाचलेच आहे.

सत्कर्म करण्याबद्दल साईबाबांची एक विशेष शिकवण लक्षात ठेवण्यासारखी आहे. एखादे सत्कर्म दुसरा करतो म्हणून आपण करू नये. आपल्याला झेपेल किंवा आपल्या गुरूने सांगितले असेल तेच आपण करावे. अध्याय ४५ मध्ये म्हाळसापतीने आपल्यासारखे अरूंद फळीवर उंच का झोपू नये, हे काकासाहेब दीक्षितांना समजावून सांगताना बाबा म्हणतात :

**एकाचे पाहूनि दुजियानें करितां।**
**कैसिया आपदा होत जीवा॥१२६॥**
**म्हणोनि आपुले आपुल्यासंगे।**
**दुजियाचे ते दुजियासंगे॥१४७॥**

– अध्याय ४५

**आपणाहूनि आपुली स्थिति।**
**आपुली भूमिका वा चित्तवृत्ति।**
**गुरु जाणे नखशिखांतीं।**
**उद्धारगतीही तोच॥११२॥**
**जैसा रोग तैसें निदान।**
**तैसेंच औषध वा अनुपान।**
**सद्गुरू नेमी शिष्यालागुन।**
**भवरोगनिवारणकार्यार्थ॥११३॥**
**त्याच शब्दांवर ठेवावें मन।**
**तयांचेंच नित्य करावें चिंतन।**
**तेंच तुमच्या उद्धारा कारण।**
**ठेवा हें स्मरण निरंतर॥११५॥**

– अध्याय ४५

## विहित किंवा सत्कर्म करण्यातील अडचणी

एखाद्या माणसाला सत्कर्म करावेसे वाटते व तो तसा प्रयत्नही करतो. तरीपण त्याच्या हातून कुकर्म घडते. याचे कारण काय? तर त्या माणसाचे पूर्वजन्मीचे कर्म आणि त्यामुळे घडलेला स्वभाव :

**परी जीव नाहीं स्वतंत्र।**
**पाठीं लागलें कर्मतंत्र।**
**तयाचा खेळचि विचित्र।**
**हातीं कळसूत्र कर्माचें॥२९॥**
**पुण्याकडे लक्ष जाय।**
**पापाकडे ओढिती पाय।**
**सत्कर्माचा शोधितां ठाय।**
**कुकर्मी काय आतुडे॥३०॥**

– अध्याय १३

**जयाचा जैसा स्वभावधर्म।**
**तदनुसार तयाचें कर्म॥१७४॥**

– अध्याय २२

सत्कर्म करण्यात आणखी एक अडचण येते :

**सत्कार्याची ऐसीच रीती।**
**आरंभी कुत्सित जन मोडा घालिती।**
**लोकप्रवादा बळी न पडती।**
**अंतीं सद्गती तयांसचि॥३६॥**

– अध्याय ३४

तरीपण माणसाने प्रयत्न जारी ठेवला, तर साईबाबा जरूर मदत करतील :

**सद्वृत्तीचे करितां नियमन।**
**महाराज देती कैसें उत्तेजन।**
**परिसा ओंठ हालविल्यावांचून।**
**अनुग्रहदान साईंचें॥१६२॥**

– अध्याय १९

**मनाच्या वृत्ति कोटयानुकोटी।**
**त्यागून ओखटी धरावी गोमटी।**
**मग पहा साईची कैंची हतवटी।**
**उभाच पाठीं भक्ताच्या॥१६२॥**

– अध्याय २९

पण प्रयत्न मात्र आपणच केला पाहिजे :

**तुम्ही जोर काढूं लागा।**
**दुधाची काळजी सर्वस्वी त्यागा।**
**वाटी घेऊनि उभाच मी मागां।**
**पृष्ठभागां आहें कीं॥१५८॥**
**म्हणाल जोर म्यां काढावे।**
**दुधाचे प्याले तुम्हीं रिचवावे।**
**हे तो आपणा नाहीं ठावें।**
**दक्ष असावे कार्यार्थी॥१५९॥**

– अध्याय १९

परंतु लोक पुरेसा प्रयत्नच करीत नाहीत. बाबांची याबद्दल तक्रार पहा :

**उतून चालिला आहे खजिना।**

एकही कोणी गाड्या आणीना।
खणा म्हणतां कोणीही खणीना।
प्रयत्न कोणा करवेना॥१६२॥
मी म्हणे तो पैका खणावा।
गाड्यावारीं लुटून न्यावा।
खरा मायेचा पूत असावा।
तेणेंच भरावा भंडार॥१६३॥

–अध्याय ३२

## कर्म आणि मोक्ष

कर्मच केले नाही, तर त्याचे वाईट किंवा चांगले फळ भोगणे कोठले? मग पुनर्जन्म घेणे कोठले? तर, हे शक्य नाही. हा देह आहे, तोवर कर्म कोणालाच सुटत नसते. संन्याशालाही पोटासाठी भिक्षा मागावीच लागते. भिक्षा न मागता कोणी आणून देईल, तरच खाईन म्हटले, तरी त्याला खाण्याची क्रिया तरी करावीच लागते; आणि ती बरोबर किंवा चुकीची केल्याचे फळ भोगावेच लागते. एवढेच नव्हे, तर आणून दिलेले अन्न स्वीकारल्याचे ऋणदेखील माथी पडतेच.

म्हणून शांती मिळविण्यासाठी आणि मोक्षप्राप्तीसाठी योग्य उपाय म्हणजे माणसाने नियत (आपल्या वाटेस आलेले) व विहित (शास्त्राने सांगितलेले व सत्कर्म म्हणून मान्य केलेले) कर्म मन लावून प्रामाणिकपणे करीत असावे; परंतु त्या कर्माचे कर्तृत्व आपणाकडे घेऊ नये व त्याच्या फळाचीही आशा करू नये. श्रीकृष्ण भगवानांनी गीतेत अर्जुनाला हेच सांगितले होते:

मयि सर्वाणि कर्माणि
संन्यस्याध्यात्मचेतसा।
निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व
विगतज्वर:॥३०॥

–अध्याय ३

(आत्मस्वरूपी चित्त लावून सर्व कर्मे मला अर्पण कर आणि फळाची आशा व ममत्व सोडून शोकरहित होऊन युद्ध कर!)

श्री साईबाबादेखील आपल्या भक्तांना हेच सांगत असत. उदाहरणार्थ: अध्याय २ मध्ये अण्णासाहेब दाभोलकरांनी श्री साईसचरित लिहिण्याची माधवराव देशपांड्यांमार्फत बाबांकडे आज्ञा मागितली, तेव्हा बाबा माधवरावांना म्हणाले होते:

माझी कथा मीच करावी।
भक्तेच्छा मीच पुरवावी।
तयाने अहंवृत्ति जिरवावी।
निरवावी ती ममपदीं॥७७॥
ऐसे वर्ते जो व्यवहारीं।
तया मी पूर्ण साह्य करी।
हे कथाच काय सर्वतोपरी।
तया घरीं राबें मी॥७८॥

तसेच, अध्याय ५१ मध्ये नांदेडच्या पुंडलिकरावांना श्री वासुदेवानंद सरस्वतींनी (टेंबेस्वामींनी) साईबाबांसाठी दिलेला नारळ जेव्हा त्यांच्याकडून चुकून वाटेत फोडून खाल्ला गेला व त्याबद्दल जेव्हा ते स्वत:ला अपराधी मानून अति हळहळत होते, तेव्हा बाबांनी त्यांना उपदेश काय केला, तो पहा:

स्वामींनी तुज दिधला नारळ।
तोही माझाच संकल्प केवळ।
माझ्याच संकल्पें फुटलें तें फळ।
अभिमान निष्फळ का धरिसी॥१७६॥
अहंकाराची धरिसी बुद्धी।
तेणें आपणा मानिसी अपराधी।
एवढें निरहंकर्तृत्व साधीं।
अवघी उपाधी चुकेल॥१७७॥

हेमाडपंतही अध्याय ४८ मध्ये सांगतात:

कर्मारंभ करू जातां।
आधी हरिगुरुचरण स्मरतां।
तेच निवारिती निजभक्तचिंता।
कर्मीं निजदक्षता ठेवलिया॥४३॥
कर्म मात्र मी करणार।
समर्थ हरिगुरु फल देणार।
ऐसा जयाचा दृढ निर्धार।
बेडा पार तयाचा॥४४॥

यालाच 'कर्मयोग', म्हणजे कर्मे करण्याची एक विशेष युक्ती (**कर्मसु कौशलम्**) असे म्हणतात; आणि ही आचरली म्हणजे कमळाचे पान जसे पाण्यात भिजत नाही तसे मनुष्याला कर्मे चिकटत नाहीत.

(पृष्ठ क्र. ३ वरून)

माझीं हाडें तुर्वतीमधून।
देतील आश्वासन तुम्हांस॥
मी काय पण माझी तुर्वत।
राहील तुम्हांसवें बोलत॥
जो तीस अनन्य शरणागत।
राहील डोलत तयासवें॥
डोळ्याआड होईन ही चिंता।
करूं नका तुम्ही मजकरितां॥
माझीं हाडें ऐकाल बोलतां।
हितगुज करितां तुम्हांसवें॥
मात्र माझें करा स्मरण।
विश्वासयुक्त अंत:करण॥
ठेवा करा निष्कामभजन।
कृतकल्याण पावाल॥''

होय! श्री साईबाबांनी आपल्याशी अविरत, निरंतर संवाद साधलेला आहे. उगाच नाही, त्यांच्या पुण्यतिथीला पंच्याहत्तर वर्षे पूर्ण झाल्यानंतरही आपल्यासारखे कैक भक्त याचा अनुभव घेत आहेत, घेत राहणार आहेत. त्यांनी आपल्या भक्तांना अभय दिलेच आहे....

''जरी हें शरीर गेलों मी टाकून
तरी मी धांवेन भक्तांसाठीं''

''नित्य मी जिवंत
जाणा हेंचि सत्य
नित्य घ्या प्रचीत अनुभवें''

मग, त्यांच्या भक्तांना चिंता कशाची?

आपल्या श्रद्धा-स्थानावरील आपल्या श्रद्धेला तेव्हाच पूर्णत्व प्राप्त होईल, जेव्हा त्या श्रद्धा-स्थानाची पूजा-अर्चा, त्या श्रद्धा-स्थानाचे नामस्मरण याबरोबरच त्या श्रद्धा-स्थानाची अमूल्य शिकवण आपण आपल्या प्रत्यक्ष जीवनात नित्य आचरणात ठेवू.

या अंकाचे मुखपृष्ठ **अजय लॅमिनेटर्स** यांनी साईसेवेच्या रूपाने लॅमिनेशन करून दिले आहे. आम्ही त्यांचे शतश: आभारी आहोत. श्री साईंचे कृपाछत्र त्यांच्यावर सदैव राहो, ही श्री साईचरणी प्रार्थना.

# बाबांचे डोळे हिऱ्यासारखे चमकत होते!

## नानासाहेब चांदोरकर यांची कन्या

### मैनाताई गणेश कुवळेकर यांचा प्रत्यक्ष अनुभव

पुणे, दिनांक १-६-१९३६: मी नानासाहेब चांदोरकरांची मोठी मुलगी. मला दोन लहान भाऊ आहेत. धाकटा बापू ४० वर्षांचा आहे. मी १२/१३ वर्षांची असताना (१८९९-१९००) आमच्या कुटुंबियांबरोबर बाबांच्या दर्शनास गेले. १९१८ नंतर काही जाणे झाले नाही. माझे वडील घोडनदी येथे मामलेदार असताना चिदंबर केशव गाडगीळ त्यांना बाबांकडे प्रथम घेऊन गेले. आम्ही तेव्हा चावडीत राहात होतो. वडील शिरडीस राहाणार होते व आम्ही गावी जाणार होतो. त्यावेळी बाबांनी आमच्याकडे येऊन भिक्षा मागितली व म्हणाले,

"जाऊ नका!"

आम्ही प्रवासात लागणाऱ्या फराळाचे पदार्थ घेऊन निघणार होतो. तेच पदार्थ बाबांना भिक्षा म्हणून दिले. **बाबांचे डोळे हिऱ्यासारखे चमकत होते.** बाबांनी दोन वेळा माझ्या वडिलांचा शिरडी सोडण्याचा बेत पुढे ढकलला, हे मला आठवते. एकदा चिथळीला कलेक्टरला भेटण्यासाठी वेळेवर गाडी गाठावी म्हणून ते निघाले. त्यावेळी हरिदास नावाच्या माणसास बाबांनी जाऊ दिले; पण वडिलांना जाऊ दिले नाही. हरिदास गडबडीने न जेवताच निघाला. माझे वडील मात्र सावकाश जेवण करून निघाले व त्यांनी गाडी वेळेवर गाठली; कारण त्या दिवसापासून गाडीचे वेळापत्रक बदलले होते. हे १९०० साली घडले. यानंतर आम्हा सर्वांना नाशिकला एका लग्नास जावयाचे होते. बाबांनी प्रथम परवानगी नाकारली; पण मग म्हणाले,

"तुम्ही जा!"

आम्ही मुलांना खाण्यास काहीच घेतले नव्हते. असा विचार केला की मनमाडला काहीतरी सोय करू; पण मनमाडच्या अलिकडच्या स्टेशनवर गाडी रूळावरून घसरल्यामुळे आम्ही उतारू उशिरा पोचलो. पुढे सर्व सुरळीत पार पडले.

माझे पती १९०४ साली पुण्यात प्लेगने वारले. फक्त त्यांना माझी आई पाहू शकली. त्यावेळी नुकतेच मला दिवस गेले होते. १९०५ साली आम्ही जामनेरला असताना माझा प्रसूतिकाल निकट आला होता. तेव्हाच रामगीर गोसाव्यांनी बाबांची उदी दिल्यावर माझी सुटका झाली. मला त्यावेळी त्याची काहीच कल्पना नव्हती. १९०८ मध्ये आम्ही पंढरपूरला होतो. माझा धाकटा भाऊ बापू वयाच्या चौथ्या वर्षापासूनच (१९०० सालापासूनच) बाबांच्या डोक्यावर एक फूल ठेवून त्यांची पूजा करीत असे. त्यावेळी बाबांची नियमित पूजा होत नव्हती. सन १९०६ मध्ये (जेव्हा मी १८/१९ वर्षांची होते) एक चष्मा लावणारे गृहस्थ बाबांचे दर्शन घेत होते. दर्शन घेताना चष्मा खाली पडला. तेथे हजर असलेल्या एका माणसाने सांगितले की तो चष्मा बाबांना देऊन टाकावा. यावर बाबा म्हणाले,

**"मला चष्मा नको. माझ्या चष्म्याची किंमत ४० रु. आहे."**

याचा अर्थ माझ्या वडिलांनी असा केला की चष्मा म्हणजे आत्मसाक्षात्कार व ४० रु. किंमत म्हणजे ४० वर्षांपूर्वी झालेला. १९०० मध्ये मी प्रथम शिरडीस गेले तेव्हा बाबा पन्नास वर्षांचे व केस पांढरे झालेले असे दिसत. १९१८ पर्यंत ते तसेच दिसत होते. १९१८-१९ च्या इन्फ्लुएंझाच्या साथीत बाबांनी देह ठेवला.

वडिलांनी बाबांविषयी दोन-तीन गोष्टी सांगितल्या होत्या. पहिली, बाबांचा व त्यांचा संबंध गेल्या चार जन्मापासूनचा होता. दुसरी, बाबांच्या बोलण्यात नारायण तेली, नारायण धोबी हे शब्द फार वेळा येत असत. त्यावरून बाबा हे ब्राह्मण संन्यासी असावेत; कारण ब्राह्मणांच्या तोंडी नारायण हे नाव घोळत असते. तिसरी, बाबा गीतेतले श्लोक म्हणत असत. त्यावरून बाबांना संस्कृत येत होते, हे निश्चित. माझे वडील कर्मठ सनातनी होते. त्यांनी बाबांचे तीर्थ कधी प्राशन केले नाही. काकासाहेब दीक्षित वगैरे ते घेत असत. सन १८९९-१९०० साली माझ्या मावशीचे यजमान बाळासाहेब बिनीवाले (ते नुकतेच ५/६ वर्षांपूर्वी दिवंगत झाले.) केवळ माझ्या वडिलांचा शब्द मोडायचा नाही म्हणून बाबांच्या दर्शनास गेले. ते दत्तभक्त होते; पण मशिदीत गेल्यावर गादीवर बाबांच्याऐवजी त्यांना त्रिमूर्ती दत्तात्रेयांचे दर्शन झाले. त्या क्षणापासून ते बाबांचे भक्त झाले ते अगदी देह ठेवीपर्यंत.

**कफनी :**

**महाराज शिरडीस प्रथम आले तेव्हा त्यांचा पोशाख भगवी कफनी, भगवी टोपी व भगवे धोतर असा होता असे म्हाळसापती सांगत असत. नंतर काशिराम शिंप्याने त्यांना हिरवी कफनी, हिरवी टोपी शिवून दिली. ती ते घालत असत. नंतर काही दिवसांनी पांढरी कफनी घालू लागले आणि डोक्याला धोतर बांधू लागले. महाराजांच्या उशाला नेहमी एक लहान गाठोडी असे. ती त्यांच्या देहावसनानंतर सोडली तेव्हा त्यातून एक हिरवी कफनी व हिरवी टोपी निघाली.**

# बीडकर महाराजांनी बजावले
# ''साईबाबांचे दर्शन घे!''
## सेवानिवृत्त सबजज्ज काशिनाथ खंडेराव गर्दे यांचा प्रत्यक्ष अनुभव

पुणे, दिनांक २९-५-१९३६: आमच्या घराण्याचे गुरु रामचंद्र महाराज तिकोटकर. माझे वैयक्तिक गुरु रामानंद महाराज बीडकर. ते सर्वज्ञानी सिद्धपुरुष होते. त्यांनी मला उपदेश देऊन एक सत्पुरुषांची यादी दिली. ह्या सर्वांना ते यात्रा करीत असताना स्वत: भेटले होते. ह्या सत्पुरुषांचे एक विशाल कुटुंबच होते व मी त्यांना भेटल्यावर हा आपला कुटुंबीयच आहे, याची ओळख पटवून ते माझे स्वागत करतील. हा अनुभव आल्यावर माझी खात्री पटेल की आपल्याला यथायोग्य गुरुदीक्षा मिळाली आहे. त्या यादीतील सर्वांपैकी –

''साईबाबांचे दर्शन घे!'' असे त्यांनी मला बजावले.

१८९८ साली बीडकर महाराजांनी मला सांगितले होते की २५ वर्षांपूर्वी, म्हणजे १८७३ मध्ये साईबाबांना ते भेटले होते. मी १९१२-१३ सालच्या मे महिन्याच्या सुट्टीत खामगावला सबजज्ज असताना शिरडीस गेलो. मला बघितल्याबरोबर बाबांनी

**''यावे रामदास!''** ह्या शब्दांत माझे स्वागत केले. ते पाहून

''सगळे सत्पुरुष तुझे हार्दिक स्वागत करतील'', अशी माझे गुरु रामानंद बीडकर महाराज यांनी दिलेली ग्वाही सार्थ ठरली. तसेच 'रामदास' माझे नाव नसूनही मी रामानंदांचा शिष्य आहे, हे ओळखल्याचे बाबांनी सूचित केले होते.

शिरडीत मी माझे डेक्कन कॉलेजातील सहाध्यायी श्री. बाळासाहेब भाटे, ज्यांनी आपले आयुष्य साईबाबांना वाहिले होते, यांच्याकडे राहिलो. रोज निरोप घ्यावयास जावे तो बाबा,

**''उद्यापर्यंत थांब!''** असे म्हणत. परतीच्या प्रवास-खर्चासाठी मी ६-७ रु. जवळ ठेवले होते. प्रथम बाबांनी माझ्याकडे २ रु. दक्षिणा मागितली व नंतर रोज एक रु. याप्रमाणे चार रुपये मागून घेतले. त्यानंतर माझ्या खिशात फक्त साडेतीन आणे राहिले होते. दुसऱ्या दिवशी बाबांनी तेही मागितले व म्हणाले,

**''अल्ला मालिक तुला भरपूर देईल!''**

यावेळी शिरडीला गेलो तो पुण्याहून गेल्यामुळे पुण्याच्या रे मार्केटातून तीन उत्तम पायरीचे आंबे मी बाबांकरिता घेतले होते. ते बाबांना अर्पण केल्यावर बाबा खूष होऊन म्हणाले,

**''हे कापून सर्वांना प्रसाद द्या!''**

एक फोड त्यांनीही सेवन केली. मग सर्वांना पुन्हा म्हणाले,

**''याने मार्केटमधून माझ्याकरिता ही फळे घेतली आणि चवही न घेता शिरडीस आणली. त्या पंडिताने याच्या अगदी उलट केले होते. त्याने माझ्याकरिता एक लाडवांचा पुडा तयार करून घेतला होता; पण गोदावरीत स्नान केल्यानंतर भूक लागल्याने त्यातले काही लाडू भक्षण करून उरलेले माझ्यासाठी आणले. हे मात्र 'उरलेले' आंबे नाहीत.''**

बाबांच्या ह्या उद्गारांवरून मी दोन निष्कर्ष काढले: (१) आपली गुरुवर दृढ निष्ठा व शुद्ध प्रेमभाव असावा. आपण खाऊन उरलेले गुरुसाठी नेऊन त्याचा अवमान करू नये. (२) आपल्या अंतर्ज्ञानाने साईबाबा ज्या दूरवर घडलेल्या घटना सांगतात त्यामुळे त्यांच्यावरील व स्वत:च्या गुरुवरील श्रद्धा बळकट होते. आठव्या दिवशी बाबांची परवानगी मिळाली व माझे मित्र बाळासाहेब भाटे यांच्याकडून पैसे घेऊन मी शिरडी सोडली. या आठ दिवसांच्या मुक्कामात मी एक असाधारण गोष्ट पाहिली. काकासाहेब दीक्षित मुंबईहून एक केस जिंकून आले होते व त्यात फीच्या रूपाने मिळालेल्या हजार-एक नगद चांदीच्या रुपयांनी भरलेली एक ट्रंक त्यांनी आणली होती. ती ट्रंक त्यांनी बाबांच्या पुढे ठेवली. बाबांनी त्यातील रुपये ओंजळींनी भरभरून फकिरांना व इतरांना वाटावयास सुरुवात केली. काही मिनिटांतच ट्रंक रिकामी झाली; पण काकासाहेबांना याचा यत्किंचितही खेद किंवा विषाद वाटला नाही.

आता बाळासाहेब भाटे यांच्याविषयी दोन शब्द....

कॉलेजमध्ये असताना ते पूर्णपणे चार्वाकपंथी होते. ते इतके धूम्रपान करीत की मी थट्टेने ''यत्रयत्र भाटे तत्रतत्र धूम:'', असे म्हणत असे. पुढे ते मामलेदार झाले व एक तडफदार अधिकारी म्हणून कलेक्टरच्या मर्जीतले झाले. ते कोपरगावला १९०४ पासून १९०९ पर्यंत मामलेदार होते. या अवधीत त्यांचे जे मित्र शिरडीस जात, त्यांची ते भरपूर कुचेष्टा करीत. इतकेच नव्हे, तर

''बाबा एक वेडा फकीर आहे'', असे म्हणत.

त्यांची मित्रमंडळी त्यांना म्हणाली,

''अहो भाटे, एकदा तरी बाबांचे दर्शन घ्या व मग तुमचे मत बनवा!''

मग १९०९ साली भाटे यांनी शिरडीलाच कॅंप ठेवला व रोज ते बाबांच्या दर्शनास जाऊ लागले. पाचव्या दिवशी साईबाबांनी त्यांना भगव्या वस्त्राखाली झाकले. त्या दिवसापासून भाटे यांच्यामध्ये आमूलाग्र बदल झाला. कामातून व पैशांतून त्यांचे लक्ष अजिबात उडाले व फक्त सेवेसाठी शिरडीस राहावयाचे व बाबांच्या नजरेसमोरच देह ठेवायचा, असा त्यांनी निश्चय केला. मग बाबांनी काकासाहेबांना भाट्यांच्या वतीने एका वर्षाच्या रजेचा अर्ज तयार करण्यास सांगून त्यावर भाटे यांची सही घेतली. कलेक्टरनेही त्यांना एक वर्षाची रजा मंजूर केली. त्याला वाटले, नंतर तरी भाटे कामावर रुजू होतील; पण ती मुदत संपली तरी गुरुचे वेड त्यांच्या डोक्यातून

(पृष्ठ क्र. ९ वर)

# श्री साईबाबांविषयी आदरभाव उत्पन्न झाला !

## गोपाळ भास्कर दातार, वकील यांचा अनुभव

ठाणे, दिनांक २६-५-१९३६: मी आता एक साईभक्त आहे. १९१७ साली नगरला असताना मी बाबांचे दर्शन घेऊ शकलो असतो; पण त्यांच्याविषयी ज्या गोष्टी कानी आल्या होत्या, उदाहरणार्थ: ते फार दक्षिणा मागतात, त्यांचे स्नान केलेले पाणी भक्तांना तीर्थ म्हणून वाटण्यात येते इत्यादी इत्यादी, त्यामुळे मी कचरलो. त्याउलट नारायण महाराजांचा मला अनुभव होता. महाराजांना एक रुपया दिला की वर खडीसाखर ठेवून ते तो प्रसाद म्हणून परत देत. पुढे काही वर्षांनी उपासनी महाराजांचे चरित्र वाचले आणि मुंबईस त्यांची प्रवचनेही ऐकल्यावर मी साकोरीला गेलो. १९३१ मध्ये उपासनी महाराजांचे लीलामृत वाचल्यावर साईबाबांविषयी माझा पूर्वग्रह निवळून आदरभाव उत्पन्न झाला. म्हणून मी साकोरीहून शिरडीस गेलो. द्वारकामाईत असलेल्या बाबांच्या प्रतिमेतील त्यांचे तेजस्वी डोळे, धुनी वगैरे पाहून माझ्या मनात आले की हे 'महापुरुष' आहेत! पुढे 'श्री साईलीला' मासिक व अण्णासाहेब दाभोलकरांचे 'श्री साईसचरित'मधील भक्तांचे अनुभव वाचून साईबाबाच माझे सद्गुरु आहेत, अशी मी खूणगांठ बांधली. तेव्हापासून बाबाच माझे सर्वकाही आहेत.

आमच्या घरातील एका बाईच्या पोटात बरेच दिवस दुखत होते. बरेच औषधोपचार करूनही काही फायदा झाला नव्हता. मी श्री साईसचरिताचे पठण करीत असताना ती ऐकत होती. माझ्या वाचनात पोथीतला तो अध्याय आला, ज्यात एका बेडकास बाबा सापाच्या तोंडातून सोडवितात. अर्थात, हे ऐकत असता ती अर्धवट गुंगीत होती व तशा गुंगीतच तिने बाबांची प्रार्थना केली. म्हणाली,

''बाबा, तुम्हाला बेडकासारख्या क्षुद्र प्राण्याची दया येऊन तुम्ही त्याला मदत करता आणि माझ्यासारख्या मानवास का यातना भोगावयास लावता?''

मग तिला भिंतीतून आवाज ऐकू आला,

''तू मला दसऱ्यासाठी ५ रु. दक्षिणा देशील का?''

ती म्हणाली,

''मी बरी झाल्यावर अवश्य देईन.''

लगेच ती जागी होऊन तिने मला ही हकीकत सांगितली आणि मग मी ५ रु. शिरडीला पाठविण्याची व्यवस्था केली. यानंतर तिची प्रकृती सुधारत गेली व दुखणे अजिबात थांबले. ही गोष्ट १९३१-३२ ची असावी.

१९३२ सालीच पुष्कळ वेळा बाबा माझ्या स्वप्नात येऊन एखाद्या लहान मुलाशी खेळावे, तसे खेळत असत. अशा एका स्वप्नात उपासनी महाराजांनी मला मदत करण्यास बाबांना विनंती केली व बाबांनी ती मान्य केली.

यानंतर काही दिवसांनी मी फार पेचात आलो. एका पक्षकाराचा महत्त्वाचा कागद माझ्या हातून गहाळ झाला. तो कोर्टात हजर करणे अत्यावश्यक होते. मी सर्व ठिकाणी चौकशी केली; पण व्यर्थ. शेवटी बाबांची मनोभावे प्रार्थना केली. दुसऱ्या दिवशी माझ्या ऑफिसातील खण सहज उघडला, तो त्यात तो कागद सापडला. त्यामुळे तो पक्षकार वेळेवर हजर राहू शकला. दोन-तीन वर्षांपूर्वी परगावच्या कोर्टाने मला कमिशन नेमून एका साक्षीदाराला विचारण्याच्या प्रश्नांची यादी पाठविली होती; पण ती यादी व इतर कागद गडबडीत कोठे ठेवले होते, ते सापडेनात. पुष्कळ ठिकाणी शोध केला; पण पत्ता लागेना. शेवटी माझ्या मनात आले की माझ्या हातून झालेला अक्षम्य हलगर्जीपणा कोर्टाला कळवून दुसरी यादी मागवावी का? त्यावेळी एक वारकरी माझ्या घरात होता. त्याला मी सर्व सांगितले. तो म्हणाला,

''ते कागदपत्र तुम्हाला मिळतील.''

बाबांची सतत प्रार्थना चालू होतीच. आश्चर्यच म्हणायचे, तो वारकरी गावी गेल्याच्या दुसऱ्याच दिवशी एका निराळ्या खटल्याच्या कागदपत्रांत ती यादी मिळाली.

पूर्वी मी आधुनिक नवमतवाद्यांच्या आहारी जाऊन श्राद्ध वगैरे भोळसट कल्पना आहेत, असे मानून हे विधी करणे बंद केले होते; पण तेव्हा प्रे. मॅजिस्ट्रेट, कुर्ला येथे नाचणे नावाचे कारकून होते, त्यांनी ते स्वत: नाशिकला त्यांच्या गतपत्नीच्या-क्रियाकर्मास गेले होते, तेव्हाचा अनुभव सांगितला, तो ऐकल्यावर श्राद्धविधीवर माझा विश्वास बसला व मी ते विधी पुन्हा करू लागलो.

(श्री साईलीलाच्या ऑक्टोबर, १९९० च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या श्री. शांताराम बळवंत नाचणे यांच्या अनुभवात वरील उल्लेख आल्याचे 'श्री साईलीला'च्या सुजाण वाचकांना स्मरत असेलच.)

(पृष्ठ क्र. ८ वरून)

जाईना, हे पाहून धर्मा (आध्यात्मिक) मुळे मनात कामाविषयी आलेली उदासीनता, हे कारण दाखवून दयाबुद्धीने दरमहा ३० रु. पेन्शन कलेक्टरने मंजूर केली.

''हा बदल कसा झाला'', असे भाटे यांना मी विचारले, तेव्हा ते म्हणाले,


''बाबांनी जेव्हा भगवे वस्त्र माझ्या अंगावर घातले तेव्हा ती माझ्या आयुष्यात आणीबाणीची व क्रांतिकारक घटना ठरली; कारण त्यावेळी माझा एकंदर दृष्टिकोनच बदलला व ऐहिक गोष्टी, उदाहरणार्थ: नोकरी करणे वगैरे एकदम त्याज्य वाटू लागल्या.'' अशारीतीने ते बाबांची सेवा करणे, त्यांच्यापुढे उपनिषद वाचणे (कधी कधी बाबा यासंबंधी एखादा सूचक उद्गार काढीत.) इत्यादी नित्यकर्मात गढून गेले. त्यांचे कुटुंबही येऊन शिरडीत त्यांच्याजवळ राहू लागले. मी साईबाबांच्या दर्शनास का व कसा गेलो, बाबांनी माझे स्वागत कसे केले इत्यादी घटना माझ्या गुरूंच्या मराठी चरित्रात प्रसिद्ध झाल्या आहेत.

—मैनाताई गणेश कुवळेकर, काशिनाथ खंडेराव गर्दे, गोपाळ भास्कर दातार या तिघांच्या अनुभवांचे मूळ शब्दांकन **कै. बी. व्ही. नरसिंहस्वामी**, मद्रास यांचे असून मराठी भाषांतर **श्री. शं. बा. पटवर्धन** यांनी केले आहे.

# श्रीसाईंचे सत्य चरित्र

## आता ग्रंथरूपात उपलब्ध !

– सौ. मुग्धा दिवाडकर




जीवनाच्या धकाधकीच्या प्रवासात आपण सुखदुःखांचा सतत अनुभव घेत असतो. संसारातील खांचखळगे ओलांडत पुढे जात असतो. अशा या संसारात सुरेलता यावी म्हणून आपल्यासारख्या संसारी जीवांना योग्य 'वाटाड्या'ची आवश्यकता असते; आणि ती गरज केवळ सद्गुरुच भागवू शकतात. श्री साईमाऊलीच्याच शब्दांत सांगायचे झाले तर....

"वाटाड्या बरोबर असला म्हणजे काही पंचाईत नाही. मग वाघ बाजूला होऊन जातात. रीस बाजूला होऊन जातात. नाहीतर एक मोठी खाई आहे तीत पडण्याची भीती असते."

या वाटाड्यापर्यंत अथवा सद्गुरुपाशी पोहोचण्यासाठी प्रत्यक्ष सद्गुरु स्वतःच सदैव कार्यरत असतो. तो स्वतः आपल्या भक्ताला चिडीच्या पायाला दोर बांधून आणावं, तसं आपल्याजवळ ओढून आणतो. तो स्वप्न, दृष्टान्त किंवा प्रत्यक्ष दर्शनाद्वारे भक्ताला आपल्याकडे आकर्षित करून घेतो किंवा शब्दाच्या प्रभावी माध्यमाद्वारे अप्रत्यक्षरीत्या अगदी कळत-नकळत, सहजगत्या आपल्याकडे खेचून आणतो; आणि आपणही आपसूक त्याच्या चरणाशी लीन होतो. या वाटाड्यामुळे आपला प्रपंचरूपी भवसागर तरून जाणे आपल्याला सुगम तर होतेच,

शिवाय आपल्या धकाधकीच्या आयुष्याला एक सुंदर, अर्थपूर्ण अशी नवी दिशा प्राप्त होऊन आपण परमार्थाच्या मार्गावर पहिले पाऊल केव्हा टाकतो, ते आपले आपल्यालाच कळत नाही. त्या सद्‌गुरुचे सार्वभौमत्व एकदा का अंगी बाणले की

**''आपला गुरु आपल्याला सांभाळायला सदैव तयार आहे आणि आता आपल्याला भिण्याचे कारण उरले नाही''**

ह्या श्री साईबाबांचे एक परमभक्त कै. श्री. काकासाहेब दीक्षित यांच्या शब्दांची प्रचिती येऊ लागते आणि

**''आता मज या पायावाचूनि। देवचि नाही आणिक जनी''**

अशी आपली वृत्ती होऊ लागते.


'सद्‌गुरुवरील शब्द' हे परमार्थाच्या दिशेने वाटचाल करण्याकरिता आपल्यासारख्या सामान्यजनांसाठी एक अत्यंत प्रभावी असे माध्यम आहे. ते वाचता-वाचता हळूहळू आपल्या मनोविकारांत बदल होत असल्याचा अनुभव आपण घेऊ लागतो आणि केव्हातरी सहजगत्या आपण पूर्णपणे त्या सद्‌गुरुचेच होऊन जातो. अर्थात, त्यासाठी ते लिखाण तितकेच विनासायास कळणारे, प्रत्ययकारी, प्रभावी, प्रवाही, ओघवते, अर्थपूर्ण, सद्‌गुरुची महती सांगणारे आणि अत्यंत समर्पक असे हवे. असे परिणामकारक आणि सर्वांगसुंदर लिखाण करणे म्हणजे खचितच सोपी गोष्ट नव्हे. त्यासाठी त्या व्यक्तीच्या कठोर परिश्रमांना सद्‌गुरुचा कृपाशीर्वाद असावा लागतो; आणि तो सद्‌गुरुच अशा पूर्वपुण्यसंचय गाठीशी असलेल्या पुण्यवान व्यक्तीकडून असे कार्य घडवून आणीत असतो. कधीतरी त्या महान व्यक्तीचे लिखाण आपल्या वाचनात येते आणि आपण त्या अर्थवाही, ओजस्वी लिखाणाने अक्षरश: भारावून जातो, त्या लेखकाचे अन्य लिखाण वाचायला मिळावे म्हणून मग आपली धडपड सुरु होते, त्याचे लिखाण नियमितपणे वाचनात असावे, अशी एक आंतरिक ओढ मनाला लागते. असे का होते? एकमेकांचा परिचय नसताना, कधी एकमेकांना पाहिलेही नसताना, केवळ त्याच्या शब्दाच्या माध्यमातून आपली त्याच्याशी जवळीक निर्माण होते, ती एवढी की शब्दांच्या द्वारे का होईना या व्यक्तीचा संबंध आपल्याशी आला नसता तर आपण उभ्या आयुष्यात खूप काहीतरी गमावले असते, अशी जाणीव होऊ लागते. एवढं सामर्थ्य त्याच्या शब्दांमध्ये यायला, ते वाचल्यावर वाचणाऱ्याला आत्मिक समाधान मिळायला कारणीभूत झालेला असतो तो लेखकाला जन्मोजन्मीच्या पुण्याईने लाभलेला श्री सद्‌गुरुचा वरदहस्त....

**मी तुझ्या पाठीशी आहे....**

या संदर्भात गेली दोन दशके नित्यनियमाने, ''दिसामाजि कांहींतरी तें लिहावें। प्रसंगीं अखंडीत वाचीत जावें॥'' या न्यायाने केवळ समर्थ सद्‌गुरु श्री साईबाबांवरच लेखन करणारे एक निस्सीम साईभक्त 'निवृत्त ले. कर्नल श्री. मु. ब. निंबाळकर' यांचे नाव चट्‌दिशी नजरेसमोर येते. लष्करातील व्यक्ती म्हटली की ती काहीशी रुक्ष स्वभावाची, करारी बाण्याची, कडक शिस्तीची, श्रद्धा, भावना वगैरेंना जीवनात फारसं महत्त्व न देणारी, अध्यात्मांपासून चार पावलं दूर राहणारी, असा समज आपल्यासारख्या सर्वसामान्यांचा आहे. श्री. मु. ब. निंबाळकरांच्या बाबतीत मात्र आपला हा समज फोल ठरतो. त्यांचं सोज्वळ रूप, त्यांचं मार्दव बोलणं, त्यांचा विनयशील स्वभाव आणि अध्यात्माने ओथंबलेला त्यांचा प्रत्येक शब्द, हे सगळं पाहिल्यावर, वाचल्यावर, अनुभवल्यावर ते कधीकाळी लष्करात मोठ्या हुद्द्यावर खरंच कार्यरत होते का? असे कुतूहलमिश्रित आश्चर्य उद्‌भवते; आणि लागलीच साईबाबांच्या वचनाची आठवण होते....

**माझा जो जाहला काया-वाचा-मनी तयाचा मी ऋणी सर्वकाळ....**

अशा या विलक्षण व्यक्तिमत्वाने श्री साईंचा व त्यांच्यावरील प्रत्येक शब्द बोलका व अर्थपूर्ण करून तो साईभक्तांपर्यंत पोहचविण्यासाठी जिकरीचे प्रयत्न चालविले आहेत.



**साईचरित्र महासागर। अनंत अपार रत्नाकर। अपार साईंच्या अपूर्व कथा। शांतिदायक भवदवार्ता। श्रोतयां देतील श्रवणोल्हासता। चित्तस्थिरता निजभक्तां॥ कानीं पडतां चार अक्षरें। तात्काळ जीवाचा दुर्दिन ओसरे। संपूर्ण कथा ऐकतां सादरें। भावार्थी उतरेल**

**भवपार।। माझी करोनियां लेखणी। बाबाचि गिरवितील माझा पाणी। मी तों केवळ निमित्ताला धणी। अक्षरें वळणीं वळवितों।। यांत माझें कांहींचि नाहीं। साईनाथांची प्रेरणा ही। ते जैसें वदवितील कांहीं। तैसें तें पाहीं मी वदें।। मी वदें हाही अहंकार। साईचि स्वयें सूत्रधार। तोचि वाचेचा प्रवर्तविणार। तरी ते वदणार मी कोण।। मीपणा समर्पितां पायांवर। सौख्य लाधेल अपरंपार। सकळ सुखाचा संसार। अहंकार गेलिया।।**

**–श्री साईसच्चरित**

---

मुळातच, साईंचे चरित्र हा एक अथांग सागर आणि त्या महासागरातून असंख्य गोष्टीरूपी, अनुभवरूपी आणि विषयरूपी माणिक-मोती अचूक हुडकून काढून त्यावर विविध प्रकारचे अत्यंत 'समर्पक' असे लिखाण करायचे हे तर फारच अवघड काम! कारण ते लिखाण 'साईमय' असणे आवश्यक आणि ते तसे असले, त्यातून भाषा अत्यंत सरळ, सोपी आणि परमार्थाची तत्वे सहज समजावून देणारी असली तर मग तो दुग्धशर्करायोगच म्हणायचा. श्री निंबाळकरांना श्री साईंच्या कृपेने हे अगदी नेमके जमले आहे. त्यांनी साईंविषयी अशातऱ्हेने चतुरस्त्र लिखाण करून साईसाहित्याच्या भांडारामध्ये अमूल्य अशी भर घातली आहे. अलिकडच्या काळात श्री साईंविषयी असे चतुरस्त्र विविधांगी लिखाण 'सातत्याने' कोणी केल्याचे स्मरत नाही. श्री. निंबाळकरांनी श्री साईबाबांचे केवळ चमत्कार व त्यांच्याबाबत त्याच त्याच विषयांच्या पलीकडे जाऊन अनेक नवीन विषय महत्प्रयासाने हाताळले आहेत; आणि त्यात ते यशस्वी झाल्याचे त्यांचे लेख वाचल्यावर अनुभवास येते. विविध विषयांचा सखोल अभ्यास करून आपल्या साईसाहित्याने त्यांनी साईभक्तांना एक नवे ज्ञानदालनच उघडून दिले आहे.

इ.स. १९२३ साली 'श्री साईलीला' मासिक सुरू झाले. त्यावेळेस हयात असलेले बाबांचे अनेक थोर भक्त त्यात सहभागी होऊ लागले. श्री साईबाबांच्या प्रत्यक्ष सहवासात असल्याने त्यांचे बाबांविषयीचे अनुभव-लिखाण 'श्री साईलीला'ची शोभा वाढवत होते; तरीही तीन वर्षांनी पुरेशा लिखाणाअभावी 'श्री साईलीला'च्या प्रकाशनात अडचण येऊ लागली. तेव्हा त्यावर उपाय म्हणून श्री साईंचे एक थोर भक्त कै. श्री. बाळासाहेब देव यांनी वाचकांना श्री बाबांविषयीचे एकूण ७७ विषय सुचविले; आणि लिहिले,

''वर लिहिल्याप्रमाणे सर्व भक्तगणांनी मनावर घेतल्यास 'श्री साईलीला' चिरायू झाल्याशिवाय रहाणार नाही.'' त्याप्रमाणे त्यांनी स्वत:च त्यांपैकी एकेक विषय हाताळायला सुरूवात केली. आज त्या गोष्टीला जवळजवळ सत्तर वर्षे झाली. 'श्री साईलीला'चे प्रकाशन अव्याहतपणे चालू आहे. आश्चर्य म्हणजे कै. श्री. बाळासाहेब देव यांनी सुचविलेल्या ७७ विषयांच्याही पलीकडे जाऊन (एखाद-दुसरा अपवाद वगळता) श्री. निंबाळकरांनी अगदी स्वतंत्रपणे अत्यंत अप्रतिम असे लिखाण केले आहे. त्यांची विविध विषय हाताळण्याची हातोटीही 'लाजवाब' आहे.

कै. श्री. बाळासाहेब देव यांचे बरेचसे लेख वाचनात आले. त्यांच्या व श्री. निंबाळकरांच्या लेखनात बरेचसे साम्य जाणवले. विषय हाताळण्याची हातोटी, मुद्दे मांडण्याची पद्धत, तर्कशुद्धता, सुटसुटीत भाषाशैली हा सारखेपणा दोघांच्याही लेखनात आढळतो. दोघांचेही परमदैवत 'श्री साईबाबा'च असल्याने साहजिकच त्यांच्याविषयीची श्रद्धा, निष्ठा आणि परमभक्ती त्यांच्या लेखांतून ठायीठायी जशी अनुभवास येते, त्याचबरोबर लेखनासाठी घेतलेल्या विषयाचा सर्वांगाने केलेला सखोल अभ्यास, त्यासाठी वापरलेली विपुल संशोधन-सामुग्री, अन्य विविध ग्रंथांतील दिलेले दाखले यावरून त्या त्या लेखासाठी दोघांनी घेतलेल्या कठोर परिश्रमांची आपल्याला कल्पना येते. थोडक्यात सांगायचे झाले, तर श्री बाबांच्या संदर्भातील सर्वसामान्यांना कळण्यास कठीण, पण अतिशय महत्त्वाचे असे विषय दोघांनीही आपल्या सहजरम्य आणि सविस्तर अशा लिखाणातून वाचकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला आहे. ही त्यांची कामगिरी आपणा सर्व साईभक्तांसाठी आणि पुढच्या कित्येक पिढ्यांसाठी नक्कीच अत्यंत मोलाची ठरणार आहे. कै. श्री. बाळासाहेब देवांनी 'श्री साईलीला'तून 'बाबांचे बाळ' या नावाने उत्तमोत्तम लेख लिहिले. हे सर्व लेख त्यांच्या साईंबद्दलच्या विषयांच्या व्यापकतेची कल्पना देतात. उदाहरणार्थ, त्यावेळच्या परिस्थितीप्रमाणे त्या अनुषंगाने लिहिलेले 'बाबा हिंदू की मुसलमान?', 'बाबा मशिदीला द्वारकामाई का म्हणत?', 'शिर्डी कशी असावी?', 'स्वप्न-सत्य की दृष्टांत', 'श्री शिलधी क्षेत्रवर्णन आणि हकीकती', 'बाबांवरील मुख्य दोन आरोपांचे खंडन–(१) बाबा दक्षिणा का मागत? (२) बाबांनी राधाकृष्णमाईला जवळ का ठेवले?', 'ज्ञानेश्वरीतील सतरावी' असे विविध विषय त्यांनी हाताळले. संस्कृत, मराठी व इंग्रजीवर त्यांचे प्रभुत्व होते. संस्कृत व मराठीत त्यांनी बाबांवर प्रार्थना व कविताही लिहिल्या आहेत. कै. श्री. देवांनी वरील लिखाणाबरोबरच त्या काळातील थोर भक्तांवरही लिखाण केले. त्यांच्याबद्दलचे अनुभव, त्यांचा श्री बाबांबरोबर घडलेला सहवास, त्यातून त्यांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या मिळालेला बोध, थोडक्यात, त्यांचा जीवनपट कै. श्री. देवांनी 'श्री साईलीला'तून वाचकांपुढे मांडला. उदाहरणादाखल घ्यायचे झालेच, तर श्री साईंच्या निकट सहवासातील थोर परमभक्त कै. श्री. नानासाहेब चांदोरकर, कै. श्री. दासगणू महाराज, कै. श्री. म्हाळसापती, कै. श्री. माधवराव देशपांडे उर्फ 'शामा' इत्यादींवरील त्यांचे विस्तृत लेख वाचनीय आहेत.

श्री. निंबाळकरांचा साईसाहित्य खजिना उघडून पाहता आपल्याला या दोघांच्याही लिखाणात वर नमूद केलेले विलक्षण साम्य तर जाणवतेच, याशिवाय वेद, पुराणे, उपनिषदे, रामायण, महाभारत अशा कित्येक धार्मिक ग्रंथांवरील त्यांचे उत्तम ज्ञानही कळून येते. कै. श्री. देवांप्रमाणेच श्री. निंबाळकरांनीही आतापर्यंत 'श्री साईसचरित-पठनाचे माहात्म्य व फलश्रुती याबद्दल निवडक ५३ ओव्या', 'श्री साईबाबांजवळ काय व कसे मागावे?', 'श्री बाबांची भक्ती का करावी?', 'षड्रिपु

का षड्मित्र', 'स्तोत्रे, स्तोत्रे, स्तोत्रे' किंवा 'बाबा व ज्योतिषशास्त्र' असे साईविश्वाच्या निरनिराळ्या क्षेत्रांना स्पर्श करणारे विषय निवडून ते आपल्या आकर्षक भाषाशैलीत भक्तांना समजावून दिले आहेत. कै. श्री. देवांप्रमाणेच श्री. निंबाळकरांचे हिंदी, इंग्रजी, संस्कृत, मराठी आणि गुजराथी ह्या भाषांवर प्रभुत्व असल्याचे त्यांच्या लेखांतून स्पष्ट उमगून येते. श्री. निंबाळकरांनीही कै. श्री. देवांप्रमाणेच श्री साईंच्या त्यावेळच्या थोर भक्तांविषयी (ज्यांच्या जीवनाबद्दल विशेषकरून पूर्वी फारसे काही लिहिले गेलेले नाही, पण ज्यांची योग्यता उच्च पातळीवरची आहे), त्यांच्या सद्याच्या वंशजांना प्रत्यक्ष भेटून, सविस्तर माहिती मिळवून ती साईवाचकांपर्यंत पोहचविली आहे. त्यांनी लिहिलेले 'चल हट्', 'सपटणेकर कुटुंब', 'तर्खड कुटुंब', 'तात्यासाहेब नूलकर', 'A place of Pilgrimage in Bombay' (इंग्रजी) यासारखे लेख वाचकाला त्या भक्ताचे प्रत्यक्ष दर्शन घडल्याचा भास निर्माण करतात. कै. श्री. देवांप्रमाणेच श्री. निंबाळकरांनीही विविध तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या आहेत व त्या प्रवासात त्यांना आलेले श्री साईबाबांच्या कृपाशीर्वादाचे अनुभवही शब्दबद्ध केले आहेत. (श्री. निंबाळकरांचा 'बाबांनी बद्रीनाथ-केदारनाथजींची यात्रा घडवली' हा लेख कै. श्री. देवांच्या 'आमचा गिरनारचा प्रवास' या लेखाची आठवण करून देतो.)

आपणा सर्वांना माहीत आहेच की कै. श्री. रघुनाथ गोविंद दाभोलकर ऊर्फ हेमाडपंत विरचित 'श्री साईसचरित' या प्रासादिक, रसाळ, अजोड ग्रंथाने प्रत्येक साईभक्ताच्या घरात व हृदयात मानाचे अढळ स्थान प्राप्त केले आहे. आपल्यासारख्या सर्वसामान्य वाचकांना ओवीबद्ध 'श्री साईसचरित' वरवर जरी कळत असल्यासारखे वाटत असले तरी त्याच्या शब्दशः अर्थापासून आपण वंचित राहतो. साईभक्तांची ही नेमकी अडचण लक्षात घेऊन श्री. निंबाळकरांनी श्री साईसचरिताचा शब्दशः अर्थ समजावून देण्याचा, अर्थाचे अनेक पापुद्रे उलगडून दाखविण्याचा, विषयाच्या अनुषंगाने तो विषय अधिक सुस्पष्ट होण्यासाठी इतर धार्मिक ग्रंथांतील माहिती देण्याचा निश्चय केला आणि 'श्री साईंचे सत्य चरित्र' या शीर्षकांतर्गत त्यांच्या श्री साईसचरितावरील गद्य भाष्य टीकेला 'श्री साईलीला'च्या मे, १९८९ च्या अंकापासून सुरुवात झाली ती मागील अंकापर्यंत नियमित चालू राहिली.

## ग्रंथनिर्मितीत लेखकाला आलेले विलक्षण अनुभव

**माझा 'श्री साईंचे सत्य चरित्र' हा कै. श्री. दाभोलकरांच्या श्री साईसच्चरितावरील गद्य भाष्य टीकेचा ग्रंथ इ.स. १९८७ च्या दसऱ्याला मी लिहीण्यास घेतला, तो इ.स. १९९० च्या दसऱ्याला लिहून पूर्ण झाला व इ.स. १९९३ च्या दसऱ्याच्या सुमारास छापून तयार झाला.**

### संतांचे आशीर्वाद

**ग्रंथ लिहीण्यास हाती घेण्याच्या काही काळ अगोदर, ३ जुलै, १९८५ रोजी स्वामी रामबाबा यांची शिरडी येथे अचानक भेट झाली. पहिल्या भेटीतच त्यांनी माझ्याबद्दल कुतूहल दर्शविले आणि पुण्यात आल्यावर आमच्या अनेक भेटी होऊन एक महिन्याच्या आतच त्यांनी माझ्यावर अनुग्रहही केला. त्यानंतर ६ मार्च, १९८९ च्या महाशिवरात्रीला त्यांचे निर्वाण होईपर्यंत आमचा गाढ संबंध राहिला.**

**पुढे शुक्रवार, ६ नोव्हेंबर, १९८७ रोजी सुरत येथे प. पू. बापूमहाराज टाट या गुजराथेतील संताच्या दर्शनाला मी प्रथमच गेलो असता व माझ्या कार्याबद्दल काही कल्पना दिली नसतानाही त्यांनी माझा शाल व नारळ देऊन सत्कार केला आणि माझ्या कार्याबद्दल आशीर्वाद देऊन मार्गदर्शनही केले.**

**नंतर, डिसेंबर, १९८८ ला बंगलोरहून प. पू. श्री श्री श्री विद्यनारायण तीर्थ स्वामी महाराजांकडून माझी त्यांची पूर्वी कधी ओळखही नसता दिनांक ३० नोव्हेंबर, १९८८ रोजीचे त्यांच्या स्वतःच्या फोटोसह आशीर्वादात्मक पत्र आले. त्यात त्यांनी नमूद केले होते की श्री साईबाबांनी त्यांना आदल्या गुरुवारी मला पत्र पाठवून शुभाशीर्वाद पाठविण्याची आज्ञा केली होती. पुढे शिरडी येथे १८-१९ फेब्रुवारी, १९८९ रोजी भरलेल्या लेखक-कवी संमेलनात त्यांचे अकल्पितपणे आगमन होऊन त्यांचे दर्शन व भेट झाली आणि प्रत्यक्ष आशीर्वाद प्राप्त झाला.**

---

'श्री साईलीला'च्या जुलै-ऑगस्ट, १९९३ च्या अंकात २७ वा अध्याय प्रसिद्ध झाल्याचे 'श्री साईलीला'च्या सुजाण वाचकांना स्मरत असेलच. येथे एका विशेष गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो की हेमाडपंत रचित पद्यात्मक 'श्री साईसचरित' ग्रंथरूपाने प्रसिद्ध होण्यापूर्वी ते 'श्री साईलीला'च्या सुरुवातीच्या अंकापासून (१९२३) क्रमशः प्रसिद्ध झाले होते. श्री. निंबाळकरांच्या गद्य भाष्य टीकेचे २७ अध्याय 'श्री साईलीला'त प्रसिद्ध झाल्यानंतर आता श्री साईसचरितातील सर्व ५३ अध्यायांवरील गद्य भाष्य टीका 'श्री साईबाबांची भक्ती का करावी याची ११ कारणे', 'श्री साईसचरित कसे वाचावे?', 'श्री साईसचरित-पठणाची फलश्रुती', 'हेमाडपंतांचे कवित्व', 'श्री साईबाबांसंबंधी घटनांची कालक्रमानुसार सूची' आदी अन्य काही महत्त्वपूर्ण लेखांसह श्री साईबाबांच्या पुण्यतिथी अमृतमहोत्सवाच्या शुभप्रसंगी ग्रंथरूपाने प्रकाशित झाली आहे. श्री साईंचे सत्य चरित्रात प्रत्येक अध्यायाच्या शेवटी त्या अध्यायावर आणखी टीका दिली गेल्याने प्रत्येक अध्याय समजण्यास सहज-सोपा होतो. जवळजवळ ज्ञानेश्वरी किंवा दासबोधाच्या आकाराचा (७ x ९ १/२ इंच) हा ग्रंथ श्री साईबाबांच्या आणि त्यांच्या संदर्भातील अन्य दुर्मिळ रंगीत व कृष्णधवल छायाचित्रांच्या समावेशामुळे आणखीनच आकर्षक झाला आहे.

## ग्रंथनिर्मितीत लेखकाला आलेले विलक्षण अनुभव

### संदर्भ ग्रंथांची उपलब्धता

अध्यायांवर आणखी टीका लिहिताना मद्रासच्या प. पू. नरसिंहस्वामींच्या 'Devotees' Experiences of Sri Sai Baba, Parts I to III' याची जरूर भासू लागली. या पुस्तकाचे दोन भाग मी आधी वाचले होते व त्याची टिपणेही करून ठेवली होती. परंतु माझ्या ग्रंथात संदर्भ देताना मूळ ग्रंथाच्या तीनही भागांची जरूरी होती. मद्रासच्या ऑल इंडिया साई समाजाकडे प्रती उपलब्ध नव्हत्या. कोणा जुन्या भक्ताकडे त्या असल्या तर थोडे दिवस मिळविण्याचा खूप प्रयत्न केला; पण निराशाच पदरी पडली. मग एके दिवशी हैद्राबादच्या 'अखंड साईनाम सप्ताह'कडून मला तीनही भाग ते एकत्र छापत असल्याचे पत्रक आले. त्यांना लगेच मी माझ्या कार्याबद्दल जाण देऊन ग्रंथ प्रकाशित झाल्याबरोबर, मी त्यावेळी मुंबईत मुलीकडे असल्याने तेथे, V.P.P.ने एक प्रत लगेच पाठविण्यास विनंती केली आणि काय आश्चर्य! मी मुंबईहून परत निघायच्या दिवशीच, दिनांक ७ नोव्हेंबर, १९८९ रोजी रजिस्टर पोस्टने ते पुस्तक आले आणि तेही प्रकाशकाकडून 'प्रसाद' म्हणून! किती किती आनंद झाला म्हणून सांगू!

---

ग्रंथात काही ठिकाणी मूळ कठीण शब्द कळण्यासाठी त्या शब्दाच्या बाजूला कंसात दुसरा सोपा शब्द दिलेला आहे. परंतु समजण्याजोग्या शब्दांनाही [उदाहरणार्थ चिंता (काळजी)] पर्यायी शब्द देण्याची खरीच आवश्यकता होती का? अशी शंका कोणी काढू शकेल. पण श्री साईसचरिताचे सखोल अध्ययन करणाऱ्याला ह्या सर्व गोष्टींची आवश्यकता असते, हे विसरून चालणार नाही. याद्दृष्टीने ते समर्पकच वाटते. श्री साईसचरितातील प्रत्येक अक्षर न् अक्षर, शब्द न् शब्द, ओवी न् ओवी, अध्याय न् अध्याय वाचकांच्या अंत:करणापर्यंत जाऊन भिडला पाहिजे, हा यामागचा उद्देश आहे. एखादा शब्द कळला नाही म्हणून फारसे बिघडत नाही, असे वरवर जरी वाटत असले तरी अध्ययनाच्या दृष्टीने त्यामुळे बरेच काही नुकसान होते. म्हणून 'अभ्यासपूर्ण अध्ययनासाठी' श्री साईसचरितातील प्रत्येक अध्यायातील, प्रत्येक ओवीतील प्रत्येक शब्द समजण्याची नितांत आवश्यकता आहे. हे समजावून देण्यासाठी श्री. निंबाळकरांनी घेतलेले अथक परिश्रम व त्यामागची त्यांची तळमळ संपूर्ण ग्रंथ वाचताना सतत जाणवते.

---

## ग्रंथनिर्मितीत लेखकाला आलेले विलक्षण अनुभव

### दुर्मिळ चित्रांची उपलब्धता

माझ्या ग्रंथात मला बरीच रंगीत व कृष्णधवल चित्रे घ्यावयाची होती. त्यापैकी बहुतेक दुर्मिळ चित्रे मला श्री साईसच्चरिताच्या जुन्या आवृत्त्यांतून मिळालीदेखील. त्याशिवाय खालील तीन चित्रे त्यांच्या सविस्तर माहितीसह खास टाकण्याची माझी इच्छा होती.

(१) शिरडीतील खंडोबाच्या देवळातील मूर्तीचे चित्र. खंडोबा आमचे कुलदैवतही आहे.

(२) श्रीमती लक्ष्मीबाई शिंदे व तिला बाबांकडून मिळालेल्या नऊ रुपयांचे चित्र. तसेच हे नऊ रुपये सध्या कोठे व कोणाकडे आहेत, याची खात्रीपूर्वक माहिती.

(३) अध्याय २१ व ४१ मध्ये वर्णिलेल्या पीर मौलानासाब, महमद हुसेनसाब व बाबा अब्दुल रहमान यांची चित्रे, तसेच त्यांच्या निर्वाणाच्या तारखा व त्यांच्या दर्गा, मुंबईत कोठे आहेत, याची सविस्तर माहिती.

खंडोबाच्या चित्रासाठी साईबाबांच्या संदर्भातील फोटो काढणारे हौशी फोटोग्राफर श्री. भोलानाथ समेळ यांना खूप प्रयत्न केल्यानंतर भेटण्यासाठी गेलो असता ते घरी भेटले नाहीत; परंतु त्यांचे धाकटे बंधू श्री. दिलीप समेळ भेटले आणि त्यांनी महापरिश्रमाने शोधून आपल्याजवळच्या खंडोबाच्या फोटोची निगेटीव्ह मला दिली.

श्रीमती लक्ष्मीबाईच्या फोटोसाठी शिरडीला मी खूप प्रयत्न केला. फोटोग्राफरला घेऊन त्यांच्या वंशजांकडे असलेल्या फोटोवरून फोटो काढण्याचा बेत केला. पण माझ्या मुक्कामात फोटोग्राफरची गाठच पडेना. पुढे कल्पना नसताना एके दिवशी लक्ष्मीबाईची नात श्रीमती शैलजाबाई गायकवाड यांचे कोपरगावहून मला पत्र आले व त्यांनी मला आपली सर्व माहिती कळवून ते रुपये त्यांच्याकडे असल्याचे मला कळविले. नंतर त्या स्वत:ही मला पुण्यास भेटण्यासाठी आल्या आणि माझ्या विनंतीप्रमाणे पुढे मला हवे असलेले फोटोही त्यांनी धाडले.

वरील तीन मुसलमान संतांच्या मुंबईतील दर्ग्यांबद्दल मला फार जिज्ञासा होती व ते शोधण्याचा मी वर्षानुवर्षे माझ्या प्रत्येक मुंबईच्या भेटीत खूप प्रयत्न केले होते; पण निराशाच पदरी पडली होती. शेवटी एके दिवशी कै. बाबासाहेब तर्खड यांचे नातू श्री. विरेन्द्र तर्खड यांनी पीर मौलानासाब यांची दर्गा वांद्रे येथे स्वामी विवेकानंद हमरस्त्यावर असलेल्या प्रसिद्ध मशिदीला लागून असलेल्या 'मौलाना लेन'च्या शेवटी आहे, असे सांगितले. तरी तेथे जाण्याचा योग लगेच आला नाही आणि आला तो दिनांक ५ ऑक्टोबर, १९९२ रोजी. मौलानासाब यांची दर्गा पाहिली, तो जवळच महमद हुसेन यांची दर्गा दिसली. तेथेच बाबा अब्दुल रहिमान यांची दर्गा डोंगरी भागात असल्याचे कळले. दुसऱ्या दिवशी तेथेही गेलो आणि आश्चर्य म्हणजे अब्दुल रहिमान यांचे चित्रही– ज्याबद्दल अध्याय ४१ मध्ये बराच उल्लेख आहे– तेही मिळाले. अर्थात, त्यांच्या निर्वाणाच्या

**इंग्रजी व मुसलमान तारखाही मिळाल्या. पुढे कै. दाभोलकरांच्या नातवाकडून मौलानासाबांचेही चित्र मिळाले. गंमत म्हणजे त्यानंतर लगेच डिसेंबर आणि मार्च महिन्यांत मुंबईत हिंदु-मुसलमानांचे दंगे होऊन आता तेथील वातावरण इतके संशयास्पद आणि भीतिदायक झाले आहे की त्या भागात जाऊन कसला तपास करणे शक्यच होणार नाही.**

---

तसेच, प्रत्येक अध्यायावरील टीका देताना त्यांनी त्या अध्यायावर विस्तृत विवेचन केले आहे. त्या अनुषंगाने आलेल्या घटना, व्यक्ती, अनुभव, तत्वज्ञान याबाबतही सविस्तर माहिती दिली आहे. त्या त्या अध्यायातील बारकावे नीट तपशीलवार नमूद करायचे, हेमाडपंतांना त्यात काय सांगावयाचे आहे, ते अधिक स्पष्ट करून, सहज समजतील असे वाचकांपुढे ठेवायचे, त्या अनुषंगाने स्वतःला सुचलेले व इतर धार्मिक ग्रंथांतील अनमोल विचार मांडायचे, असे विस्ताराने चौफेर लिखाण करून श्री साईंचे 'व्यापकत्व' आणि 'सार्वभौमत्व' सामान्यांपर्यंत पोहोचवायचे, जेणेकरून ते साईभक्त ह्या कथांचे श्रवण, मनन आणि निदीध्यासन करून संपूर्ण 'साईमय' व्हावेत, ही श्री. निंबाळकरांची अनिवार इच्छा या ग्रंथाच्या अत्यंत मोलाच्या कामगिरीने फलद्रुप झाली आहे. हेमाडपंतांनी म्हटलेच आहे....

**''कथा श्रवण। करा मनन आणि निदीध्यासन। होईल स्मरण आणि ध्यान। आनंदघन प्रगटेल॥''**

अध्याय ४ मधील श्री बाबांच्या जन्माविषयीचे सविस्तर विवेचन, अध्याय १७ मधील ब्रह्मज्ञानावरील विस्तृत विवेचन, अध्याय २२ व अध्याय ४५ मधील श्री गुरुचरणांचा महिमा, अध्याय ४३ मधील उत्तम गति प्राप्त होण्यास मरणसमयी काय करावे, अध्याय ७ व ४४ मधील बाबांचे योगसाधनेतील प्राविण्य, अध्याय ५० मधील 'तद्विद्धिप्रणिपातेन'वरील उत्तम टीका, तसेच इतर अध्यायांमधील सगुण भक्तीचा महिमा, बाबांचा राग, बाबा आणि उपवास, अध्याय ३८ मधील अन्नदानाविषयीचे निरूपण अशा कित्येक विषयांवर त्या त्या विषयाला अनुसरून उत्तमोत्तम निरूपण केले आहे. काही ठिकाणी आवश्यकतेनुसार श्री साईसच्चरितातील पदं जशीच्या तशी देऊन ती सुंदररीतीने तपशिलासह स्पष्ट करून सांगितली आहेत. हे सर्व उलगडवून दाखवित असताना त्यातील साहित्यिक मूल्यांचाही श्री. निंबाळकरांनी विचार केला आहे. त्यांचा 'हेमाडपंतांचे कवित्व' हा अप्रतिम लेख याला साक्ष आहे.

थोडक्यात, साईचिंतनाची प्रेरणा देणारा, साईंच्याच कृपाप्रसादाचा वरदहस्त लाभलेला असा हा मूल्यवान ग्रंथ वाचून कोणी ''श्री. निंबाळकर हे आधुनिक काळातील हेमाडपंत आहेत'', असे म्हटल्यास बिल्कुल वावगे ठरणार नाही. श्री. निंबाळकरांचा हा ग्रंथ श्री साईबाबांची कृपा व आशीर्वाद लाभलेल्या 'श्री साईसच्चरित' या हेमाडपंत रचित ओवीबद्ध ग्रंथाइतकाच महत्त्वाचा ठरेल, यात शंकाच नाही. इतकेच नव्हे, तर असा हा सुंदर ग्रंथ प्रत्येक साईभक्ताने आपल्या संग्रही ठेवण्याजोगा झाला आहे. या ग्रंथाच्या सहाय्याने वाचलेले 'श्री साईसच्चरित' आपल्याला पूर्ण आकलन झाल्याचा नक्कीच आनंद देईल. परमपूज्य श्री साईबाबांनी हेमाडपंतांकडून 'श्री साईसच्चरित' हा अद्वितीय ग्रंथ लिहवून घेतला आणि त्यानंतर आता जवळजवळ सत्तर वर्षांनी श्री साईंच्या आदेशानेच त्यांचे परमभक्त श्री. निंबाळकर यांच्याकडून 'श्री साईंचे सत्य चरित्र' लिहिले गेले आहे.

---

## ग्रंथनिर्मितीत लेखकाला आलेले विलक्षण अनुभव

### तिन्ही निंबाळकरबंधूंची सेवा

**बडोद्याला माझ्या धाकट्या बंधूकडे ग्रंथ छापून झाला व ग्रंथाचे कव्हर छापायला घेतले. मीही त्यावेळेस बडोद्यास होतो. कव्हरसाठी मी बाबांचे एक चित्र दिले होते. पण ऐनवेळी माझ्या धाकट्या बंधूला त्यात काही दोष आढळला व तो दुसरे एखादे बाबांचे चित्र मागू लागला. आता बाबांची दुसरी चित्रे पुण्यास होती व वेळ तर फार थोडा होता. इतक्यात मला माझ्या चित्रकार मधल्या बंधूने चितारलेल्या बाबांच्या तैलचित्राच्या फोटोची आठवण झाली. पण तोही पुण्यासच राहिला होता; मधल्या बंधूजवळ त्याची निगेटिव्ह विचारता तीही हरवलेली होती. आम्ही विचारात पडलो व बाबांची आठवण करून म्हटले, बाबा ऐनवेळी काय हे संकट धाडलेस? तो, लगेच मधल्या बंधूकडे तो फोटो सापडला आणि आमचे काम होऊन बाबांचे सुंदर चित्र माझ्या ग्रंथावर छापले गेले. अशाप्रकारे या बाबांच्या ग्रंथाला आम्हा तिघाही बंधूंचे हातभार लागले. म्हणजे बाबांनी आमच्या निंबाळकर कुटुंबाकडून संपूर्ण सेवा घडवून घेतली. केवढे आमचे भाग्य!!**

### सारांश

**वरील अनुभवांवरून माझी खात्री झाली आहे की साईबाबांवर भार टाकला म्हणजे तेच सर्व व्यस्थित करवून घेतात आणि आपले कार्य सिद्धीस जाते :**

**जाणा सकल साईंची सत्ता।<br>
भार घालोनि तयांवरता।<br>
कार्य करितां निरभिमानता।<br>
सिद्धि ये हाता अविकळ॥१८७॥<br>
परी म्हणाल मी हें करीन।<br>
धराल अत्यल्पही अभिमान।<br>
फळ येईल तात्काळ दिसोन।<br>
विलंब क्षणही न लागेल॥१८८॥**

**—श्री साईसच्चरित, अध्याय २७**

---

श्री साईंनी या अवघड कामाकरिता अगदी 'योग्य' व्यक्तीचीच निवड केली, असे कुणालाही श्री. निंबाळकरांचे 'श्री साईंचे सत्य चरित्र' वाचल्यावर वाटेल.

---

**मासोमासीं काढूनि अवसर। कथा परिसल्या ज्या हा काळवर। त्या जयाच्या, तयाचा विसर। नेदा क्षणभर पडावया॥ आपण जों जों सप्रेम चित्ता। परिसतां या साईच्या कथा। तों तों मी जो येथील वक्ता। तया उल्हासता दे**

साई।। तैसें जैं श्रोते न दत्तावधान। वक्ता न केव्हांही सुप्रसन्न। परस्परांच्या प्रसन्नतेवीण। वाउगा शीण श्रवणाचा।। परम दुस्तर भवसागर। उसळती मोहाच्या लाटा अनिवार। आदळती अविचार-तटावर। पाडिती तरुवर धैर्याचे।। वाजतो अहंकाराचा वारा। तेणें हा डहुळे सागर सारा। क्रोधद्वेषादि महामगरां। मिळे जैं थारा निर्भयपणें।। 'मी माझें' हा मगर। वासना विकल्प भंवरे अपार। निंदा-असूयादि जेथें तिरस्कार। असंख्य जलचर तळपती।। ऐसा जरी हा सागर भयंकर। अगस्तिरूपें प्राशी गुरुवर। तयांचे जे चरणरजकिंकर। तयां न लवमात्र भय त्यांचें।। म्हणोनि साई समर्थ सद्गुरु। होऊनियां भवाब्धीचें तारू। आम्ही जे केवळ कासधरू। त्यां सर्वांस उतरू पैलपार।। महादुस्तर हा भवार्णव। करा साई चरणांची नाव। दावील निर्भय पैल ठाव। पहा नवलाव निष्ठेचा।। पाळितां या ऐशा व्रता। भासे न संसारदु:ख-तीव्रता। लाभ न अन्य येणेंपरता। सेव्य समर्थता ती हीच।। साईचरणीं अत्यंत भक्ती। नयनीं कोंदो साईमूर्ती। साईच दिसो सर्वांभूतीं। ऐसी ही स्थिती भक्तां येवो।। होऊनियां स्वच्छंदवर्ती। पूर्वजन्मीं पावलों च्युती। आतां तरी लाभो सद्गती। संगनिर्मुक्ति ये अर्थी।। पाठीसी असतां श्रीसमर्थ। कोणीही लावूं न शके हात। ऐसिया निर्धारिं जे निर्धास्त। धन्य ते भक्त साईंचे।। असो आतां येतें मना। धरूनियां बाबांच्या चरणां। करावी तयांस एक प्रार्थना। सकल भक्तजनांकारणें।। कीं हा ग्रंथ सर्वां घरीं। असावा नित्य पाठांतरीं। नियमें प्रेमें पारायण करी। संकटें वारी तयांचीं।।

–श्री साईसच्चरित

---

सच्चिदानंद सद्गुरु श्री साईनाथ महाराजांच्या पुण्यतिथीला यंदा ७५ वर्षे पूर्ण झाली व त्यांचे निस्सीम भक्त श्री. निंबाळकरांच्या वयालाही याचवर्षी ७५ वर्षे पूर्ण झाली आणि याचवर्षी श्री. निंबाळकरांचा 'श्री साईंचे सत्य चरित्र' हा ग्रंथ प्रसिद्ध होऊन एक अनोखा त्रिवेणी संगम घडून आला. याला श्री साईबाबांची कृपादृष्टीच म्हणायचे.

६६७ पृष्ठांचा हा अपूर्व ग्रंथ सुरेख अक्षर-जुळवणी, पांढरा शुभ्र कागद, सुबक छपाई, उत्कृष्ट मुखपृष्ठ, मजबूत बांधणी यामुळे देखणा, लक्षवेधी व सर्वस्पर्शी झाला आहे.

---

चोखट करूनि अंत:करण। भक्तिभावें करावें पारायण। एक, द्वि, वा त्र्यहनीं करावें पूर्ण। साईनारायण तोषेल।। अथवा करावा सप्ताह गोड। मिळेल पुण्यसंपत्तीची जोड। साई पुरवील मनींचें कोड। भवभय मोड होईल।। प्रारंभ करावा गुरुवासरीं। उष:कालीं स्नानानंतरीं। बसावें आपुल्या आसनावरी। उरकुनी सत्वरी नित्यकर्म।। मंडप घालवा रम्य विस्तीर्ण। रंभा, कर्दळी, वसनादि करून। उपरी सुंदर आच्छादन। घालून विभूषित करावा।। त्यांत करावें उच्चासन। भोंवतीं काढाव्या भिन्न भिन्न। रंगवल्ल्या रंगपूर्ण। नयनसुभग असाव्या।। साईसद्गुरु-प्रतिमा करून। अथवा सुंदर छबी घेऊन। उच्चासनीं ठेवावी जपून। करूनि वंदन प्रेमभावें।। चीनांशुकीं ग्रंथ बांधोनी। सद्गुरुसन्निध त्या ठेवूनी। पंचोपचारें उभयतां पूजुनी। आरंभ वाचनीं करावा।। व्रतस्थ राहावें अष्ट वासर। करावा गोरस वा फलाहार। अथवा भर्जित धान्य प्रकार। नक्त रुचिर वा एकभुक्त।। प्राचीदिशीं मुख करून। सद्गुरुमूर्ती मनीं आठवून। करावें स्वस्थ मनेंकरून। ग्रंथवाचन मोदभरें।। अष्ट, अष्ट, आणि सप्त। अष्ट, षट्, अष्ट, सप्त। एवं पाठ करावा दिन सप्त। अवतरणिका फक्त अष्टमाहनीं।। अष्टमदिनीं व्रतपारणा। करूनि नैवेद्य साईनारायणा। सुग्रास भोजन आप्तेष्ट-ब्राह्मणां। दक्षिणा यथाशक्ति त्यां द्यावी।। अवंतूनि वैदिक ब्राह्मणां। करावी निशीं वेदघोषणा। पयशर्करापान संभावना। देऊनि तन्मना निववावें।। अंतीं वंदूनि सद्गुरुचरणां।। अर्पावी त्या उचित दक्षिणा। धाडावी ती भांडारभुवना। संस्थाननिधिवर्धनाकारणें।। येणें तोषेल साईभगवान। देईल भक्ता पसायदान। छेदील भवभय-लेलिहान। दावील निधान मोक्षाचें।।

–श्री साईसच्चरित

---

आजकालच्या धावपळीच्या जीवनात मनाचं संतुलन केव्हाही व कुठेही बिघडण्याचीच शक्यता अधिक असते. अशा वेळी बुद्धीला योग्य दिशेने चालना मिळण्यासाठी उत्तम मार्गदर्शकाची गरज असते. ही भूमिका 'श्री साईंचे सत्य चरित्र' अगदी योग्यतऱ्हेने पार पाडू शकेल, हे निश्चित.

ग्रंथ– 'श्री साईंचे सत्य चरित्र'
लेखक– ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
प्रकाशक– ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
पृष्ठे– ६६७
मूल्य– रु. २००

हा सर्वांगसुंदर ग्रंथ पुढील ठिकाणी उपलब्ध आहे.

(१) ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त), १/१४ फाईव्ह स्टार अपार्टमेंटस्, बंड गार्डन रोड, पुणे–४११००१.

(२) श्री. के. व्ही. मांडवीकर, श्री साईदास मंडळ, ८३/८४ रासने चाळ, शिवाजी नगर, पुणे–४११०५३.

(३) श्री. मनोहर घनश्याम पितळे, पितळेवाडी, हनुमान रोड, दत्तमंदिरासमोर, विलेपार्ले (पूर्व), मुंबई–४०० ०५७.

(४) श्री. सतीश खंडेराव माने, ९ कृष्णचंद्र, ई वॉर्ड, साने गुरुजी वसाहत, एस्. एम्. घाटगे शोरूमच्या मागे, कोल्हापूर–४१६ ००५.

ग्रंथ पोस्टाने मागवायचा झाल्यास पोस्टेज व पॅकिंगसाठी रु. ३० अधिक लागतील.

ग्रंथ पोस्टाने मागविण्याचे ठिकाण: विशाल ऑफसेट, सी–१/१११ सरदार इस्टेट, आजवा रोड, वडोदरा–३९००१९, गुजराथ.

स्मरण यात्रा

# १८ अध्यायी श्रीमद्‌भगवद्‌गीतेचे १८ प्रश्न

१. संस्कृतमध्ये गीता किती?

२. श्री व्यासांना १८ हा आकडा प्रिय होता काय? होता असल्यास कसा?

३. पांडव सैन्यातील १८ महारथी कोण?

४. गीतेमध्ये किती व्यक्ती बोलतात?

५. गीतेचे एकूण श्लोक किती?

६. गीतेत एक श्लोक फक्त एकाच्याच तोंडी एकाच वेळी आला आहे. ती व्यक्ती, तो श्लोक व तो अध्याय कोणता?

७. ज्ञानेश्वरांनी समाधी घेताना कोणता अध्याय मांडीवर उघडा ठेवून समाधी घेतली?

८. गीतेत एक ओळ दोन वेळा आली आहे. ती ओळ कोणती व केव्हा आली आहे?

९. थोड्या-फार फरकाने एक ओळ दोन वेळा आली आहे. ती ओळ कोणती व केव्हा आली आहे?

१०. एल्.आय.सी.चे घोषवाक्य कोणते? ते शब्दगीतेत कोणत्या अध्यायात, कोणत्या श्लोकात आहे? संपूर्ण श्लोक कोणता?

११. दुसऱ्या अध्यायात कोणाची लक्षणे सांगितली आहेत?

१२. बाराव्या अध्यायात कोणाचे गुण-वर्णन केले आहे?

१३. तेराव्या अध्यायात कोणाची लक्षणे आली आहेत?

१४. सोळाव्या अध्यायात कोणत्या संपत्तीचे गुण वर्णिले आहेत?

१५. १०व्या अध्यायात मुख्य किती प्रकारच्या विभूती भगवंतांनी सांगितल्या आहेत?

१६. गीतेतील एका श्लोकाला 'एक श्लोकी' गीता म्हणतात. तो श्लोक कोणता?

१७. गीतेमध्ये भक्तांचे ४ प्रकार सांगितले आहेत. ते ४ प्रकार कोणते?

१८. भगवद्‌गीतेची आणखी किती नावे आहेत? ती कोणती?

## वरील प्रश्नांची उत्तरे पुढीलप्रमाणे :

१. संस्कृतमध्ये खालील गीता सांगण्यात येतात.

(१) पिंगल गीता (२) विचरन्यु गीता (३) मंडी गीता (४) बोध्य गीता (५) यम्याक गीता (६) हरित गीता (७) वृम गीता (८) पराशर गीता (९) हंस गीता (१०) अनु गीता (११) ब्राह्मण गीता (१२) अवधुत गीता (१३) अष्टावक्र गीता (१४) ईश्वर गीता (१५) उत्तर गीता (१६) कपिल गीता (१७) गणेश गीता (१८) देवी गीता (१९) पांडव गीता (२०) ब्रह्म गीता (२१) मोक्ष गीता (२२) राम गीता (२३) व्यास गीता (२४) यम गीता (२५) शिव गीता (२६) सूर्य गीता (२७) भगवद्‌गीता (२८) (गुरुचरित्र अंतर्गत) गुरू गीता

२. होय. कारण (१) गीतेचे अध्याय १८ (२) महाभारताची पर्वं १८ (३) कौरव-पांडवांचे सैन्य १८ अक्षोहिणी (४) महाभारतातील युद्ध १८ दिवस (५) पहिल्या अध्यायातील पांडवांच्या सैन्यातील महारथी १८

३. पांडव सैन्यातील १८ महारथी:

(१) भीम (२) अर्जुन
(३) सात्यकी (४) विराट
(५) द्रुपद (६) धृष्टकेतु
(७) चेकितान (८) काशिराज
(९) कुंतिभोज (१०) शैब्य
(११) युधामन्यु (१२) उत्तमौजा
(१३) अभिमन्यु व १४ ते १८ द्रौपदीचे पाच पुत्र

द्रौपदी – युधिष्ठिर – प्रतिविंध्य (१४)
द्रौपदी – भीम – रउतसोम (१५)
द्रौपदी – अर्जुन – श्रुतकीर्ति (१६)
द्रौपदी – नकुल – शतानील (१७)
द्रौपदी – सहदेव – श्रुतकर्मा (१८)

४. गीतेत ४ व्यक्ती बोलत आहेत. (१) धृतराष्ट्र (२) संजय (३) अर्जुन (४) श्रीकृष्ण

५. ७००

६. धृतराष्ट्र, पहिला अध्याय, पहिला श्लोक

७. ९वा अध्याय

८. ॥मन्मना भव मद्‌भक्तो मद्याजी मां नमस्कुरू॥ अध्याय ९, श्लोक ३४

९. (१) ॥यं प्राप्य न निवर्तन्ते तद्धाम परमं मम॥ अध्याय ८, श्लोक २१
(२) यद्‌गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम॥ अध्याय १५, श्लोक ६

१०. ॥ योगक्षेमं वहाम्यहम् ॥
॥ अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्॥ अध्याय ९, श्लोक २२

११. दुसऱ्या अध्यायात स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगितली आहेत.

१२. बाराव्या अध्यायात भक्ताची ३६ लक्षणे वर्णन केली आहेत.

१३. तेराव्या अध्यायात ज्ञानाची २० लक्षणे आली आहेत.

१४. सोळाव्या अध्यायात दैवी संपत्तीचे २६ गुण वर्णिले आहेत.

१५. १०व्या अध्यायात मुख्यत: ७५ विभूतींचे वर्णन आहे.

॥ऐशियाही सातपांच प्रधाना।

(पृष्ठ क्र. १८ वर)

# साई जगाचा जीवनदाता


**–श्री. वि. म. हटवार**
नागपूर.


**श्री** साईसेवेत विश्वास, पवित्रता, उत्साह, आत्मसंयम, श्रद्धा व विनयशीलता असेल, तर कार्यसिद्धी नक्कीच होते. सद्व्यवहारातही त्यागवृत्ती, उपकारक मनोवृत्ती व नैतिकता पाहिजे.

मनुष्यजीवनात ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास असे चार आश्रम प्रत्येकी २० ते २५ वर्षांचे मानलेले आहेत. पहिला पंचवीस वर्षांचा आयुष्याचा काळ जर पवित्र संस्कार व उत्तम आरोग्याने यशस्वी झाला, तर पुढचा गृहस्थाश्रम सुखमय होतो. वानप्रस्थाश्रमी साईचिंतनाने अध्यात्मभाव वैराग्याकडे नेतो आणि मनुष्यजीवनाच्या उद्दिष्टाची पूर्ती करतो.

मानवाची सर्वात मोठी शक्ती ही विचारशक्ती आहे. सदाचारी व्यक्ती या शक्तीचा सदुपयोग करतात व दुराचारी विचारशक्तीचा दुरूपयोग करतात. मनुष्य स्वतःच आपला मित्र व शत्रू आहे. आत्मतत्व जाणणारा उत्तम मित्र असतो. श्री साईनाथाने अशा सर्वांना एकत्र आणून त्यांच्या हस्ते जनकल्याणाचा मार्ग स्वतःच्या प्रभावाने कायम केला. साईप्रेमी भक्तांनी आपला मानसन्मान, पद, सुख, आराम, अधिकार इत्यादी सोडून शिरडीस साईचरणी सेवा रूजू केली. सरळमार्गी, पवित्र व निष्कलंक जीवनाने, निर्भयतेने ते आपले कार्य पूर्ण करू शकले. सत्कर्माचे प्रतीक 'श्री साई समाधी-मंदिर' सर्वांचे प्रेरणास्थळ म्हणून कायम झाले.

विज्ञान जसे बाह्यजगतातील सत्याचे विश्लेषण आहे, तसेच अध्यात्म अंतर्जगतातील सत्याचा साक्षात्कार आहे. सूज्ञ व समाधानी समाजाच्या निर्मितीस विज्ञानापेक्षाही अध्यात्म ज्ञान जास्त अनिवार्य आहे. वैदिक काळात सर्वप्रकारच्या विद्यांमध्ये गुरुजन अग्रगण्य होते. अशाच महामानवाचा अवतार गोदावरीच्या पुण्यमयी क्षेत्रात अवतीर्ण झाला व त्याने शिरडीस अध्यात्म साधनेचे केंद्र बनविले. श्री साईबाबा हे सत्वगुणप्रधान व दया, धर्म, धैर्य, निष्कामता ह्या लक्षणांनी परिपक्व झालेल्या सद्गुणांचे प्रतीक आहेत. महामारी व दुर्धर व्याधींवर मात करण्याची त्यांची कला म्हणजे वैज्ञानिक शक्तीचा चमत्कारच होता. श्री साईनाथांचे जीवन ही एक आध्यात्मिक शक्तीची प्रयोगशाळाच होती. मनुष्यजीवनाचा समतोल, चित्ताची शांतता व अध्यात्म ज्ञानाचा विकास होण्यासाठी साईसचरिताचा अभ्यास उपयोगी होईल.

आपल्या गतिशील जीवनात जे काही सत्य आपण समजतो व पाहतो, ते वास्तविक सत्य नसून तो मायेचा आविष्कार आहे. हे जग अध्यात्मवादी, माया व भौतिक तत्वांनी व्यापलेले आहे. सर्व सृष्टीत जड व चेतनाचे मिश्रण दिसते. यालाच प्रकृति व पुरुष म्हणतात. संपूर्ण चराचर विश्वात कर्ता, धर्ता, हर्ता एकमात्र परमात्मा आहे. म्हणून परमात्मतत्व अवश्य जाणावे. आज वैज्ञानिक मनसुद्धा शांत व सुखी जीवनाची अपेक्षा बाळगून असते; कारण भौतिक क्रांतीने जग ग्रासलेले आहे. भौतिकवादाचे अध्यात्माकडून नियंत्रण राहिले नाही, तर वैज्ञानिक प्रगतीही मानवास घातक ठरेल, यात शंकाच नाही.

श्री साईरामाने सांगितलेल्या परमात्मतत्वाच्या ज्ञानाशिवाय अज्ञानातून मुक्त होणे शक्य नाही. अज्ञानाच्या नाशालाच मोक्ष म्हणतात. मोक्ष ही आत्म्याची शुद्धावस्था होय! ईश्वरामध्ये लय झाल्यावर जीवात्म्याचे स्वतःचे अस्तित्व समाप्त होते. ढगामुळे जसा सूर्य झाकला जातो, त्याप्रमाणे मायेमुळे स्वयंप्रकाश झाकला जातो. स्वयं प्रकाशस्वरूप साईश्वरापासून परमतत्वाची अनुभूती होऊन ते तत्व जाणता येते. स्वार्थ व वासना ओलांडून दिव्य जीवनाचा पंथ स्वीकारणे आवश्यक आहे. अंतर्मनाच्या कक्षेत शिरण्यास देहाचे चाळे सोडले पाहिजेत.

साईगीतेचा मार्ग प्रभावी जीवन जगण्याचा आहे. प्रत्येक श्रद्धामय भावयुक्त जीवन ही पूजा साईश्वराने स्वीकारली आहे. या भक्तियुक्त यज्ञात सर्व सार्थ परिवारांना सामील करण्याचा मार्ग 'श्री साईलीला' प्रकाशनाद्वारे दर्शविण्याचा प्रयत्न होत आहे, हे सत्य असले तरी सत्यशोधकांची उणीव भासत आहे.

श्री साईबाबा जीवनदाता असून सर्व प्रयत्नवादी भक्तांवर कृपा करणारे ते थोर जागृत संत आहेत. साईरामाच्या अवतारकार्यपूर्तीस यंदा ७५ वर्षे पूर्ण झालीत तरी आजही समाधीमंदिरात व्यक्त केलेले भक्तांचे मनोगत पूर्ण झाल्याची प्रचिती येते.

---

(पृष्ठ क्र. १७ वरून)

विभूति सांगितलिया तुज अर्जुना।
तो हा उद्देशु जो गा मना।
आहाच गमला॥
अध्याय १०, श्लोक ३०२, ज्ञानेश्वरी

१६. ॥ तस्मात सर्वेषु कालेषु
मामनुस्मर युद्ध च।
मय्यर्पितमनो
बुद्धिर्मामेवैष्यस्यसंशयः॥
अध्याय ८, श्लोक ७

१७. आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी, ज्ञानी
॥ चतुर्विधा भजन्ते मां
जनाः सुकृतिनोऽर्जुन।
आर्तो जिज्ञासुरर्थार्थी
ज्ञानी च भरतर्षभ॥

१८. गीतेची १८ नावे अशी आहेत:
(१) गीता (२) गंगा (३) गायत्री
(४) सीता (५) सत्या
(६) सरस्वती (७) ब्रह्मविद्या
(८) ब्रह्मवकी (९) त्रिसंध्या
(१०) मुक्तिहोहीती (११) यर्धमात्रा
(१२) चिदानंदा (१३) भवहनी
(१४) भयनाशिनी (१५) वेदत्रयी
(१६) परा (१७) अनन्ता
(१८) तत्वार्थज्ञानमंजरी।

ज्ञत्येतानि जपेन्नित्यं नरो,
निश्चल मानसः।
ज्ञानसिद्धी लभेच्चीघ्रं तथान्ते
परमं पदम्॥

–संकलन
**श्री. के. के. अुन्हाळे**
नांदेड.
(श्रीमद्भगवद्गीता शिबीर, अशोक नगर, नांदेड यांच्या सौजन्याने)

# मन केवढं केवढं....

– पंडित ग. रा. सावंत

'मन'.... नुसती दोनच अक्षरे, ज्यांना काना, मात्रा, उकार, रफार, वेलांटी अनुस्वार वगैरे काहीच नाही; परंतु मनाविषयी जर लिहायला गेले तर एक मोठा ग्रंथही अपुरा पडेल, इतके त्यावर लिहीण्यासारखे आहे. योगशास्त्रात या मनाला ताब्यात ठेवण्याकरिता खूप उपाय सांगितलेले आहेत. लाख प्रयत्न करूनसुद्धा ते आपल्या ताब्यात राहत नाही. इतके मन विचित्र आहे. ''लहान मूर्ती, पण अगाध कीर्ति'' ही म्हण येथे लागू पडते. याला खूप उपमा दिल्या आहेत. विचित्र, चैनी, विलासी, लोभी, क्रूर, दुष्ट, लालची, खट्याळ अशी याची कीर्ति आहे. हे विचित्र मन कसे ताब्यात राहील, याविषयी आपल्या ऋषी-मुनींनी खूप प्रयत्न करून योगाच्या बळावर यास पूर्ण ताब्यात ठेवता येते, हा शोध लावला. हा एक साधा व सरळ उपाय आहे. मन जर योगबळावर आपल्या काबूत आले तर वाटेल ते कार्य त्यापासून आपल्याला करून घेता येते. अनहोनीला होनीमध्ये बदलविणारी कार्ये आपण यापासून करून घेऊ शकतो.

याचे आपल्या शरीरात निश्चित स्थान कोठे आहे, हे अजून कोणीच जाणू शकलेले नाही. संपूर्ण शरीराची जरी चिरफाड केली तरी या इवल्याश्या वस्तूचे स्थान आपल्याला सापडणार नाही; कारण त्याला अमुक-एक असे ठिकाण आहे कुठे? मग, आपले सर्व व्यवहार चालतात कसे? असा प्रश्न उपस्थित होतो. मन शरीरात नाही, हे आपण नाकारू शकत नाही. संपूर्ण शरीराचे संचालन या मनाद्वारे होते. मनामुळेच आपण हसतो, रडतो, रागावतो, प्रसन्न होतो, दूरदूरच्या कल्पना करू शकतो. संपूर्ण शरीर मनाच्या ताब्यात आहे. म्हणूनच कदाचित कबीराने म्हटले असेल,

**''मन गया सो जाने दे, मत जाने दे शरीर''**

प्रत्येक धर्मातील साधूसंतांनी या मनाविषयी बरेच काही लिहिलेले आढळेल. या मनाची शक्ती इतकी अद्‌भुत आहे की ते एका क्षणात संपूर्ण विश्वाला चक्कर घालून येऊ शकते. प्रकाशाचा वेग १८६००० मैल आहे. तर मनाचा वेग प्रकाशापेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे.


प्रत्येकाच्या शरीरात हे मन दोन प्रकारांनी दिसून येते. एक बाह्यमन व दुसरे अंतर्मन. ही एकाच मनाची दोन अंगे आहेत. जशा प्रत्येक नाण्यास दोन बाजू असतात, त्याचप्रमाणे मनालासुद्धा दोन बाजू आहेत. बाह्यमन कल्पना करते आणि ते कार्यात आणण्याचे काम अंतर्मन करीत असते. आपण ज्या काही इच्छा करतो त्या सर्व पूर्ण होत नसतात. त्याला कारण आपले अंतर्मन असते. उदाहरण जर द्यायचे झालेच तर असे देता येऊ शकते....

आपण ज्या ठिकाणी नोकरी करीत आहोत त्या ठिकाणाहून आपली बदली आपल्या गावी व्हावी अशी आपली इच्छा असते. त्याप्रमाणे आपण प्रयत्न करतो. कोणत्या साहेबाकडे हे काम आहे, ते कुठे राहतात, कोणाच्या मध्यस्थीने हे काम होऊ शकते, हे सर्वकाही आपण जाणून घेतो. अजून माहिती मिळते की आपल्याच खात्यात या साहेबाचा एक नातेवाईक आहे व तोसुद्धा त्याच्या बदलीच्या प्रयत्नात आहे. येथवर माहिती मिळवीपर्यंत बाह्यमन थकून जाते. मग, पुढचे काम होईल की नाही, याचा विचार आपण अंतर्मनाच्या स्वाधीन करतो. त्याचवेळी आपले अंतर्मन डगमगते व ते अंतर्मन म्हणते की जोपर्यंत साहेबांच्या नातलगाचे काम होत नाही तोपर्यंत आपली बदली होणे शक्य नाही. येथेच आपले सर्वकाही संपते. म्हणजेच, आपली बदली होण्यासाठीचा आपला विचार आपल्या अंतर्मनाने खोडून टाकला. मग आपले बदलीचे काम कसे होईल? त्याकरिता जे काही बाह्यमन विचार करील तो एकच विचार अंतर्मनाने कायम ठेवला पाहिजे.

इतकेच नसून आपण दृढनिश्चय केला पाहिजे की मी बदली करूनच दाखवीन. असे जर झाले तर आपले काम झाल्याशिवाय राहणार नाही; कारण आपण ते प्रत्यक्षात आणण्याकरिता नाना उपाय करू आणि मग, असे अथक प्रयत्न केल्यानंतर आपले काम होणार नाही, हे कसे शक्य आहे? म्हणून एकच विचार मनात आणू या. त्याला बिल्कुल खोडून टाकायचे नाही. थोडा वेळ जास्त जरूर लागेल; परंतु काम निश्चितच होईल, यात शंका नाही. सांगावयाचे हेच की इतकी शक्ती त्या अंतर्मनाची आहे. मात्र, अंतर्मनातून दृढभावनेने व एकाग्र मनाने केलेली इच्छा पूर्ण होते आणि मन त्याचवेळी एकाग्र होऊ शकते, ज्यावेळी मन निर्विकारी (विचारशून्य) राहील. मन एकाग्र आणि विचारशून्य करण्याकरिता सोपा आणि सरळ मार्ग त्राटक-साधना होय! त्राटकाविषयी पुढे लिहिले आहे.

या लहानश्या मनाला एकाग्र करणे खचितच सोपी गोष्ट नाही; असाध्य मात्र नक्कीच नाही. रोज थोडा थोडा प्रयत्न जरी केला तरीसुद्धा काही दिवसांनी सफलता अवश्य मिळेल. याचे दोन मार्ग आहेत: एक असा की आपल्या मनात जेवढे विचारतरंग उठत असतील, ते उठू द्या. एकामागून दुसरा, दुसऱ्यामागून तिसरा याप्रमाणे शेकडो विचार उठतील. त्या विचारांकडे फक्त लक्ष असू द्या. असे हजारो विचार उठत राहिल्याने आपले मन थकून दुसरा विचार करण्याची शक्ती त्यात राहणार नाही. त्यानंतर ते शांत होईल. शांत मनच एकाग्र होऊ शकते. अशांत मनाकडून हे कदापि शक्य नाही. दुसरा मार्ग असा की मनाला एकाच कामात मग्न ठेवू द्यावे, जसे ''हरि ओम्''चा जप करीत राहणे. या जपामुळे सर्व लक्ष त्या ''हरि ओम्''कडेच राहील, त्याला दुसरा विचार करण्याची संधीच मिळणार नाही. याप्रकाराने मन एकाग्र होऊ शकते.

''हरि ओम्'' हा मंत्र एका लयीने व प्रत्येक अक्षरातील अंतर वाढवीत म्हणावा. म्हणजे मग, मन इकडे-तिकडे न जाता त्याच मंत्रावर केंद्रित होईल. सुरुवातीला हे इवलेसे मन खूप प्रयत्न करूनसुद्धा जास्त



वेळ एकाग्र राहू शकत नाही, लागलीच दोन-तीन सेकंदात पुन्हा त्याचे विचार करण्याचे काम सुरू होते. मनाला दररोज एकाग्र करायची सवय लावीत गेल्यास त्याला त्याविषयी गोडी उत्पन्न होते. मनाला अशी गोडी लागली की माणसाला कोणतेच काम अशक्य नाही. एकाग्र मनाने सोडलेले विचारसंक्रमण किती प्रभावी असते, हे पुढील उदाहरणावरून लक्षात येईल. रबरी फुग्यात पाणी भरल्यावर त्याला दोन-चार बारीक भोके पाडून त्यावर दाब दिल्यास त्यातून निघणाऱ्या पाण्याच्या धारा एकदम जोराने व लांबपर्यंत जाणार नाहीत. त्याच फुग्यास जर एकच भोक पाडले व दाब दिला तर त्यातून निघणारी धार दूरपर्यंत जाईल आणि तिचा वेगही जोरात असेल. यावरून सहज लक्षात येईल की एका विचाराचा आणि अनेक विचारांचा प्रभाव यात किती फरक आहे. अजून एक असे की बहिर्गोल भिंगातून सूर्यकिरणे एका ठिकाणी एकत्रित होतात व ते किरण एखाद्या वस्तूवर टाकले तर आग लागू शकते.

योगबळाने शरीरातील विद्युतशक्ती जागृत होते. अशा वेळी एकाग्र मनाने सोडलेले विचार दुसऱ्याच्या अंतर्मनाला जाऊन भिडतात व आपण जी इच्छा मनात धरली असेल त्याप्रमाणे कार्य होते. समजा, आपल्याला एखाद्या व्यक्तीकडून पैसे उसने घ्यावयाचे आहेत. हा एकच प्रभावी विचार मनात धरल्यानंतर आपल्या मनातील निघणाऱ्या विचारांची वलये थेट त्या माणसाच्या अंतर्मनात जाऊन पोहचतील. त्या व्यक्तीला थोडा वेळ बेचैन झाल्यासारखे वाटेल. असे का होत आहे? असा प्रश्न त्याला पडेल. लगेचच त्याच्या लक्षात आपले नाव येईल व तो खिशात पैसे घेऊन आपल्याला द्यावयास येईल. त्या क्षणी त्याला असा भास होतो की या व्यक्तीने माझ्याजवळ पैशांची मागणी केली होती. आपण त्याला अजूनपर्यंत ते दिलेले नाहीत. तसेच काही महत्त्वाचे काम असेल म्हणूनच तर त्याने मागणी केली ना? वास्तविक, प्रत्यक्षात तुम्ही कसलीच मागणी केली नव्हती; फक्त विचारसंक्रमण सोडलेले होते. याचमुळे त्याच्या अंतर्मनाला वरीलप्रमाणे भास झाला. मात्र, याचा उपयोग चांगल्या कामाकरिताच झाला पाहिजे. हे एक उदाहरण म्हणून दिलेले आहे. कारण तशी ही एक फसवणूकच आहे. दुसऱ्याच्या मनावर दबाव आणून आपले काम साधून घेणे, हा आपला मतलबीपणा झाला. असली कामे कधीच करू नयेत. अशी कामे केल्याने काही दिवसांनी आपल्या मनाप्रमाणे कधीच काम होणार नाही.

आपण काही मांत्रिक लोक पाहिले असतीलच. मंत्र-तंत्र करणारा आपल्या अंतर्मनाद्वारे विचार-संक्रमण सोडतो. त्याचा प्रभाव रोगी माणसाच्या अंतर्मनावर व अवयवांवर पडतो. त्यामुळे तो रोगमुक्त होतो. यामधील मर्म असे की त्या रोग्याची भावना त्या मांत्रिकावर असते. ही व्यक्ती फारच जाणकार आहे, याच्यापासून मला निश्चितच लाभ होईल, ही त्याची पक्की भावना झालेली असते. ही भावना आणि मांत्रिकाने सोडलेले विचार याचा रोग्याच्या मनावर इष्ट तो परिणाम होतो आणि तो रोगमुक्त होतो.

शुद्ध व पवित्र मन फारच लवकर एकाग्र होते. त्याकरिता प्राणायाम व योगासने नियमित केल्याने मन ताबडतोब शुद्ध होऊन ताब्यात येते. याबरोबरच आपल्या आहारावर नियंत्रण असले पाहिजे. त्यात नियमितपणा हवा. सात्विक आहारात पालेभाज्या, फळफळावळ, पोळी, दूध-भात, मुगाच्या डाळीचे वरण यांचा समावेश होतो. नेहमी असला आहार घेतल्याने मन शुद्ध, प्रेमळ व सात्विक होते. नशा येणाऱ्या वस्तू, जसे दारू, गांज्या, भांग हे कधीच घेऊ नये. इतकेच काय, पान, तंबाखू, विडी, सिगारेट यांचेही व्यसन नको. मटन, मासे यांचे दोन घास कमी घ्यावेत. शक्य झाल्यास एकदम व्यर्ज करावेत. दुसऱ्याकडील खाणे शक्यतोवर टाळावे. चहा, कॉफी दिवसातून एकदाच घेण्याचा नियम ठेवावा. चमचमीत, तिखट, शिळे अन्न खाऊ नये. हॉटेलमधील जेवण किंवा इतर पदार्थ खाण्याचे टाळावे. हप्त्यातून एक दिवस तरी उपवास करावा. त्या दिवशी फराळ करू नये, जेणेकरून शरीरातील यंत्राला आराम मिळेल. उपवास करण्यामागचा मूळ हेतू हाच आहे.


रोज सकाळी लवकर उठून सकाळचा प्रातर्विधी आटोपल्यावर स्वाध्याय, पोथी-पुराणे वाचावीत. चांगले ग्रंथ वाचल्याने मनात सात्विक विचार वाढतात. मन

ध्यान-मार्गाकडे वळते. अश्लील वाचन कधीच करू नये. त्यामुळे मन इकडे-तिकडे भटकते आणि त्यास ताब्यात ठेवणे कठीण जाते. नेहमी चांगले वाङ्मय वाचण्याची सवय लावावी. इतकी बंधनं पाळल्यास आपण आपल्या बाह्य व अंतर्मनाला ज्या मार्गाकडे नेऊ त्या मार्गाला ते वळते. आपण म्हणाल, इतकी बंधने पाळणे कसे शक्य आहे? शक्य का नाही? एक एक बंधन पाळण्यास सुरुवात केली, तर काही दिवसांनी सहजा-सहजी सवय होऊन जाते. एकदा का सवय जडली म्हणजे माणसाला वर उल्लेख केलेल्या गोष्टींविषयी वीट उत्पन्न होते व मनुष्य ते खाण्याचे टाळतो.

कोणतेही व्यसन माणसाला लागले तर त्याची शरीराला सवय होते व तो शेवटी व्यसनाधीन होतो. याउलट आपण वरील गोष्टी टाळल्या की शरीराला तसे वळण लागते व ते वाईट व्यसनापासून दूर राहते. हे एक व्यसन समजून बंधने पाळली म्हणजे तिच सवय आपल्याला लागते. सवयीचा परिणाम आपल्या शरीरातील अवयवांवर कसा होतो, ते पुढील उदाहरणावरून दिसून येईल. एक बस-कंडक्टर आपल्या घरी पत्र लिहावयास टेबलाजवळ खुर्ची घेऊन बसतो. खूप प्रयत्न करूनसुद्धा तो दोन-तीन ओळींपेक्षा जास्त लिहू शकत नाही. शेवटी, तो त्याच्या पत्नीस जवळ बोलावितो व तिला सांगतो, जरा हे टेबल मी हे पत्र लिहीपर्यंत हलवीत रहा, म्हणजे मग मला पत्र लिहीता येईल. त्यावर त्याची पत्नी म्हणते, का बरे? तो म्हणतो, मला चालू गाडीत लिहीण्याची सवय आहे. या ठिकाणी गाडी तर नाही. पत्र लिहीणेही अगत्याचे आहे. शेवटी, ती खरोखर टेबल हलविते व तो चांगल्या अक्षरात पत्र लिहीतो. सांगावयाचा मुद्दा हा की तुम्ही ज्याप्रमाणे सवय लावाल त्याप्रमाणे आपल्या शरीरातील अवयवांना सवय होते. म्हणून, चांगल्या सवयी लावायला हव्यात. लबाड, लुच्चे, लफंगे यांची संगत न धरता चांगल्या व्यक्तींशी मैत्री जोडायला हवी, जेणेकरून त्यांच्या सहवासात आपली सुधारणा होते. नेहमी शुद्ध व पवित्र मन राहील, याची खबरदारी घेतली पाहिजे.

''मन चिंती ते वैरी न चिंती'' अशी म्हण प्रचारात आहे. ती कशी, ती पुढील उदाहरणावरून दिसून येईल. आपण आपल्या लाडक्या मुलास आपल्या फुरसतीच्या वेळेत मोटारसायकलीवर फिरावयास नेतो. स्वत:चे बाळ असल्यामुळे जास्त प्रेम असणारच. आपल्या मुलाला कसलाच त्रास होऊ नये, याची आपण काळजी घेतो. निघते वेळी कसलाच वाईट विचार आपल्या मनात नसतो. परंतु, थोडे पुढे गेल्यावर आपले अंतर्मन आपल्यालाच उलट प्रश्न करते की अपघात तर होणार नाही ना? मनात असला विचार येताच साऱखे तेच तेच मनात असते. गाडी आपल्या गतीने चालत आहे. मन वेगळ्या विचारात मग्न आहे. तशात, ज्या रस्त्यावरून आपण नेहमी जातो तेथे पूर्वी अपघात झालेला असतो, तो आपल्याला माहीत असतोच. नेमकी ती जागा आली की अपघात होतो. ज्यावेळेस आपण एकटे निघतो त्यावेळेस इतकी काळजी स्वत:ची घेत नसतो व तसला विचारसुद्धा मनात येत नाही. पण, लाडका मुलगा सोबत आहे आणि त्याला काही व्हावयास नको, ही भावना असल्यामुळे तसले विचार मनात येतात आणि हेच मनातील विचार अपघात घडवून आणतात. काही वाईट व्हावयास नको, हा विचार सारखा घुटमळतो व तोच वाईट विचार त्या अपघाताला कारणीभूत होतो. वास्तविक असला विचार करण्याची गरजच काय होती? परंतु, आपल्या मनाला फालतू शंका-कुशंका काढण्याची जणू खोडच असते. चांगल्याऐवजी वाईट विचार मनात लवकर येतात. जे तुम्ही पेराल तेच उगवेल. ज्वारी पेरल्यावर त्यापासून गहू कधीच उत्पन्न होणार नाही, ज्वारीच उगवेल. वाईट

(पृष्ठ क्र. २८ वर)



!! माझी कथा मींच करावी ।
भक्तेच्छा मींच पुरवावी ।

# साईकृपा

!! तयानें अहंवृत्ति जिरवावी ।
निरवावी ती ममपदीं !!

वर्ष ७२ अंक ६-७ • श्री साईंच्या कृपाप्रसादाचे वार्तापत्र • सप्टेंबर-ऑक्टोबर, १९९३


## समुद्राच्या तळाशी मृत्यूच्या फासातून श्री साईबाबांनी सोडविले !

(श्री. पंढरीनाथ तामोरे, माहिम, मुंबई यांच्याकडून):

भादव्याचा सन हाय आज दर्याचा
नारले पुनवेचा
चला रे चला तुमी पूजेला चला
कोळ्याचा सन हाय आज वर्साचा
नारले पुनवेचा....!!
तू दरया सागरा, सागरा रे माज्या....
घे कां अमुची ही नारळाची पुज्या....
पयला मान घे यो मुरबें गावाचा !!

या पारंपारिक कोळी गीतानं मुरबे गावकरी नारळी पौर्णिमेच्या सणाच्या दिवशी सागराची भक्तिभावानं पूजा करीत होते.

नुकताच श्रावण महिना संपत आला होता. भाद्रपदाचे आगमन सुरू झाले होते. आकाश निरभ्र दिसत होते. समुद्राचे पाणी निवळले होते. सबंध निळं आकाश सागराच्या पाण्यात बुडून गेलं होतं. वारा मंद आणि सुखकारक वाहात होता. खारे वारे दर्यावर्दी मच्छिमारांना जागवीत होते. मासेमारी धंद्याचे दिवस आता सुरू होत होते. जाण्याच्या तयारीत होत्या. या मासेमारी धंद्याची सुरूवात ते खोल सागरात कव मारून करीत. या कवीकरिता खोल पाण्यात जीवाची पर्वा न करता काबाडकष्ट उपसावे लागतात. हे सर्व ध्यानात घेऊन मुरब्याच्या तुकारामची एकच घाईगर्दी उडाली होती. दर्यात जाण्याच्या तयारीकरिता साधन-सामुग्री, दोर, तेल, जाळी, शिड इत्यादी आवश्यक वस्तू आठवणीनं घेऊन त्या तो पडताळून पाहत होता.

सातपाटी आणि खारेकुरण या सागरी किनाऱ्यांवरील गावादरम्यान वसलेलं मुरबे गाव ! या मुरबे गावात शिरताच प्रथमदर्शनीच साईबाबांचे मंदिर दृष्टीस पडतं. रस्त्याच्या कडेलाच, पण उंचवटयावर ! पाच-सहा मिनिटे एकेक पायरी वर चढून गेलं की मंदिरात जाता येते. गाभाऱ्यात साईबाबांची भव्य तेजस्वी मूर्ती नजरेत भरते. बाजूला अखंडपणे तेवत राहणारा नंदादीप ! त्या दीपाच्या प्रकाशात साईंची प्रसन्न व तेजस्वी मूर्ती डोळ्यांत भरते. दुपार आणि संध्याकाळी तीनही वेळी नित्यनेमानं पूजा केली जाते. त्या पूजेतही गुरूवारची पूजा विशेषप्रकारे करण्यात येते.

तुकारामने साईबाबांची भक्तिभावानं पूजा करून आपल्या बारा खलाश्यांसह बोट सागराकडे वळवली. मुरबे येथील एकेक बोट कव मारण्याच्या कामाकरिता सागराकडे झेपावत होती.

"हे साई, मी 'हरिहरप्रसाद' बोट घेऊन कव मारण्याकरिता खोल सागरात जात आहे. माझ्यावर कृपादृष्टी राहू दे !" अशी प्रार्थना तांडेल तुकारामने हात जोडून केली.

सकाळच्या कोवळ्या किरणांत एकेक बोट मुरबे, सातपाटी, खारेकुरण येथून खोल दर्यात खाऱ्या वाऱ्यांना सामोरे जात मार्गक्रमणा करीत होती. ठराविक वेळेच्या अंतरावर येताच तांडेलाने सहकाऱ्यांना विचारून कव मारण्याची जागा निश्चित केली व बोट थांबवली. कव मारण्याची तयारी युद्धपातळीवर सुरू झाली. गेला.

खेळणाऱ्या पाण्याच्या लाटांवर बोट उदासपणे हिंदकळत होती. कुठेतरी लाकूड तक्रारीच्या स्वरात करकरत होते. बोटीच्या कुशीवर लाटांचे सपकारे बसत होते. ते बसणारे सपकारे उदास वाटत होते. बोटीत असलेल्या दर्यावर्दींना थोड्याच वेळात तुकारामची आई झोपेतून उठून खडबडून जागी झाली. तिला भयंकर असं स्वप्न पडलं होतं. ते स्वप्न स्पष्टपणे आठवत होतं.

त्यांची 'हरिहरप्रसाद' बोट समुद्रात १५वाव खोल अंतरावर तरंगत होती. बोटीवर कव मारण्याचं काम सुरू झालं

